शुक्रवार, १८ नोव्हेंबर २०२२
⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -९४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●FRIDAY 18 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-98 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-5

# बारामती ॲग्रोने स्वाभिमानीचे आंदोलन चिरडले

## पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी घेतले ताब्यात; आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड : उसाच्या एफ.आर.पी.साठी स्वाभिमानीचे धुळे-सोलापूर महामार्गवरील पाणपोही येथे सुरु होते आंदोलनकर्त्यांनी बारामती ऍग्रोच्या कारखाण्याला उसवाहतूक करणाऱ्या वाहणांची हवा सोडून दिल्याने या आंदोलन दरम्यान स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कृषिभूषण भाऊसाहेब थोरात, जिल्हाद्यक्ष कृष्णा साबळे, कन्नड तालुकाद्यक्ष प्रकाश बोरसे, दिनकर पवार, निसार पठाण, तालुका कार्यकारिणी सदस्य सुदाम मन्सूबराव जगताप, बाळासाहेब चोपडे, राजू हारदे,विजय आहेर, आबासाहेब आहेर यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यानंतर उपविभागीय असेलधिकारी मुकुंद आघाव यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी यांची बैठक घेतली व तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.**

कन्नड तालुक्यातील बारामती ऍग्रोच्या साखर कारखान्याने प्रतिटन अडीच हजार रुपये एफ.आर.पी. अर्थात शेतकऱ्यांना उसाची पहिली उचल द्यावी याकरिता स्वाभिमानी शेतकरी संघटना व शेतकऱ्यांनीं धुळे/सोलापूर महामार्गवरील पाणपोही येथे आंदोलन सुरु केले होते. बारामती ऍग्रोच्या साखर कारखान्याला ऊस घेऊन जाणाऱ्या वाहनांना अडवून जोपर्यंत बारामती अग्रो साखर कारखाना प्रतिटन अडीच हजार रुपये शेतकऱ्यांना पहिली उचल देत नाही तोपर्यंत ऊस कारखान्याला जाऊ देणार नाही अशी भूमिका घेतली मात्र पोलिसांनी बळाचा वापर करून स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी व शेतकऱ्यांना ताब्यात घेतले. पोलिस वाहनाने कन्नड शहर पोलिस ठाण्यात ताब्यात ठेऊन नजरकैदेत ठेवले आहे. मात्र तरीही जोपर्यंत शेतकऱ्यांना अडीच हजार रुपये उसाची पहिली उचल मिळणार नाही तोपर्यंत खा. राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचे स्वाभिमानी संघटनेने कळवले आहे. दरम्यान यावेळी शेतकरी स्वाभिमानी संघटनेचे कृषिभूषण भाऊसाहेब थोरात, जिल्हाध्यक्ष कृष्णा साबळे, कन्नड तालुकाद्यक्ष प्रकाश बोरसे, दिनकर पवार, निसार पठाण, तालुका कार्यकारिणी सदस्य सुदाम जगताप, बाळासाहेब चोपडे, राजू हारदे, विजय आहेर, आबासाहेब आहेर यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते व त्यानंतर उपविभागीय पोलिस अधिकारी मुकुंद आघाव यांनी बैठक घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.



### पत्रकारांना असिसटंट मॅनेजर सतीश एलांडे यांनीं सुरक्षा रक्षकांकरवी व्हिडिओ शूटिंग घेण्यास केला मज्जाव

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या आंदोलन कव्हर करण्यासाठी गेलेल्या पत्रकारांना बारामती ऍग्रो साखर कारखान्यात व कारखाना आवारात उभ्या असलेल्या वाहनांची व्हिडिओ शूटिंग घेण्यास असिस्टंट मॅनेजर सतीश एलांडे यांनीं सुरक्षा रक्षकांकरवी मज्जाव केला व तुम्हाला काय शूटिंग घ्यायची आहे ती कारखान्याच्या बाहेरून धुळे सोलापूर रास्ता जातो त्याठिकाणी जाऊन बाहेरून घ्या असे पत्रकारांना सुरक्षा राक्षकांच्या मोबाईलवरून फर्मावले कारखाना प्रशासन एवढे निगरगट्ट आहे कीं शेतकऱ्यांच्या हितासाठी लढणाऱ्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या आंदोलनाची पत्रक कारखाना प्रशासन स्वीकारताना आढेवेढे घेते व कुठल्याही प्रकारची पोहचलो आवक/जावक विभाग साधी पोहच देत नाही अश्या कारखाना प्रशासनाचा निषेध सर्व स्तरातून होत आहे .

# देश के लिए काम करो




भारत जोडो यात्रेदरम्यान वाडेगावमध्ये गुरूवारी दुपारी राहुल गांधींच्या स्वागतासाठी हजारो नागरिक रस्त्यावर उतरले होते. ज्ञानेश्वर हायस्कुलच्या विद्यार्थ्यांनी लेझीम पथक आणि देशभक्तीपर गीतांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांनी झळकवलेले 'डरो मत'चे फलक सर्वांचे लक्ष्य वेधून घेत होते.

# व्यावसायिक शिक्षण प्रगतीपथावर घेऊन जाईल : प्रा. सुनील रेडेकर

## परभन्ना फाउंडेशनतर्फे सेवाकार्य कृतज्ञता पुरस्कारांचे वितरण

आधुनिक केसरी न्यूज


**पुणे :** सामाजिक, आर्थिक विकास होण्यासाठी चांगले शिक्षण घेणे गरजेचे आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात प्रगतीपथावर जायचे असेल, तर पारंपरिक शिक्षणाला व्यावसायिक शिक्षणाची जोड द्यायला हवी. ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणासाठी आपण प्रत्येकाने पुढाकार घ्यायला हवा," असे मत पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष प्रा. सुनील रेडेकर यांनी व्यक्त केले.

विविध क्षेत्रात सेवाकार्य करणाऱ्या सेवाव्रतींना परभन्ना फाउंडेशनच्या वतीने सेवाकार्य कृतज्ञता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नवी पेठेतील पत्रकार भवनच्या कमिन्स सभागृहात झालेल्या कार्यक्रमाला लोकशाही संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे पी. आर. सोनवणे, कर्वे सामाजिक संस्थेतील सीएसआर विभागाचे संचालक प्रा. डॉ. महेश ठाकूर, परभन्ना फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. गणेश चप्पलवार आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे (आरोग्य), शेतकरी युवानेता कैलास येसगे (कृषी), मधुबन कृषी पर्यटनाचे तृनीत कुथे (पर्यटन), पत्रकार रामचंद्र भंडारवार (पत्रकारिता), पोलिस उपनिरीक्षक बालाजी डिगोळे व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रशांत कांबळे (प्रशासन), उद्योजक तिलोकराज भालेराव (उद्योजकता), राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सरचिटणीस भूपेंद्र मोरे (राजकारण), अभिनेता कपिल कांबळे (सांस्कृतिक), राईट टू लव्हचे के. अभिजित (सामाजिक), अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब चौगुले (शैक्षणिक), लेखक व पर्यावरण अभ्यासक बसवंत विठाबाई बाबाराव (पर्यावरण) यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सुनील रेडेकर म्हणाले, "पुणे विद्यार्थी गृहाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरीब, गरजू व होतकरू मुलांना शिक्षण देऊन घडविले जाते. ११३ वर्षांचा हा ज्ञानदानाचा हा वारसा पुढे नेत आहोत. शिक्षणच आपल्याला तारणार असून, त्याला मूल्यांची व संस्कारांची जोड मिळाली, तर भारतातील तरुण पिढी आणखी प्रगती करू शकेल. पी. आर. सोनावणे म्हणाले, "भारतीय संविधानाने आपल्याला न्याय व सन्मानाने जगण्याचा अधिकार दिले आहेत. त्याचबरोबर काही कर्तव्येही सांगितली आहेत. संविधान अबाधित ठेवण्याचे प्रत्येकाचे दायित्व आहे. या देशातील आदिवासींना, मागास घटकांना मुख्य प्रवाहात आणून प्रगतीच्या दिशेने घेऊन जाण्याची संधी संविधानाने दिली आहे. आपण कोणत्याही क्षेत्रात काम करत असलो, तरी आपल्यातील सामाजिक बंधुभाव जपायला हवा. समाजाच्या समस्या सोडवण्यात माझे काय योगदान असू शकेल, असा विचार करून प्रत्येकाने काम केल्यास अनेक प्रश्न सुटतील, असे प्रा. डॉ. महेश ठाकूर म्हणाले.गणेश चप्पलवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विजय गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. गणेश काळे यांनी आभार मानले.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## फिटे अंधाराचे जाळे

आधुनिक केसरी



इथे बघ. किती विपरीत परिस्थिती असताना ही माणसे आनंदात आहेत ! आपल्या वागणुकीचा आदर्श इतरांसमोर ठेवून दिव्याने दिवा लावावा तसा यथाशक्ती परिसर उजळत आहेत. दिवाळी तर नुकतीच संपली होती. पण इतरांना वाट दाखवणारी अनोखी दिवाळी करमरकर कुटुंबीय कायम साजरी करत आहेत. खरोखरच त्यांनी लिहिलेले ' फिटे अंधाराचे जाळे ' हे पुस्तकाचे नाव किती सार्थ आहे ! वल्लरीचा सेरेब्रल पाल्सीचा आजार करमरकर कुटुंबीयांनी लहानपणीच लक्षात आला. पण निराश न होता याच मुलीला आपल्या परीने शिकवायचे, वाढवायचे याचा ध्यास भालचंद्र करमरकर, सौ विद्याताई करमरकर आणि वल्लरीची आत्या या तिघांनी घेतला. हा निर्णय तर घेतला पण तो अमलात आणणे सोपी गोष्ट नव्हती. नियतीने त्यांची कठोर परीक्षा घेतली. त्यांना आपल्या आवडीनिवडी, हौसमौज आदी सगळ्या गोष्टी बाजूला ठेवाव्या लागल्या.

काहींनी त्यांना नावही ठेवली. अनाहूत सल्ला दिला, उपदेश केला. पण आपल्या निश्चयापासून ही माणसे यत्किंचतही ढळली नाहीत. समर्थांच्या उक्तीप्रमाणे ही सगळीच मंडळी म्हणजे जणू ' निश्चयाचा महामेरू '. त्यांच्या जागी कोणीही असते तर अशा मुलीसाठी त्या पालकांनी व्रतवैकल्यं, बुवाबाजी इ चा मार्ग अनुसरला असता. ते स्वाभाविकही म्हटले गेले असते. पण करमरकरांनी यातली कोणतीही गोष्ट केली नाही. त्यांनी कास धरली ती वैद्यकीय उपचारांची, विवेकाची आणि प्रयत्नांची. असे करताना त्यांच्या सहनशक्तीची, संयमाची कसोटी लागली. पण त्यांनी आपली जिद्द, चिकाटी सोडली नाही. ते असं करत असताना वल्लरीची सुद्धा त्यांना मनापासून साथ होती. आपल्याला शिकायचंय, मोठं व्हायचंय या जिद्दीने वल्लरी सुद्धा त्यांच्या प्रयत्नांना साथ देत होती. अखेर करमरकर कुटुंबीयांपुढे दैव हरलं. प्रयत्नांना यश आलं. वाटा उजळल्या. या प्रयत्नांची सुरुवात वल्लरीला साधं नीट बसता येत नव्हतं. काही खाता पिता येत नव्हतं यासारख्या गोष्टींपासून झाली. हातापायांमध्ये, स्नायूंमध्ये शक्ती नव्हती. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

## आर्थिक समतोल सांभाळावा

आधुनिक केसरी

कौटुंबिक कलहांची सुरुवात आर्थिक कारणांमुळे होत असल्याचे अनेकदा समजते. विवाहानंतर उभयतांनी मिळवलेले आपापले उत्पन्न हे स्वतःसाठीसुद्धा न वापरता जोडीदाराने मिळवलेल्या पैशावर हक्क दाखवायचा, त्यांतूनच खर्च करायचा आणि स्वकमाईतून मिळालेला पैसा शिल्लक ठेवायचा. ह्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी केवळ पैशाचीच गरज भासू लागते. "स्व" अर्थ नाही तर "परम" अर्थ हीच भावना रुजणे तापदायक, घातक ठरू शकते, ही जाणीव होणे आवश्यक असते. आर्थिक पातळीवर माझे ते माझेच आहे, पण तुझे सुद्धा माझेच आहे, असा विचार करणारी व्यक्ती मानसिक पातळीवर मात्र तुझे-माझे करून मोकळे होताना दिसते. एकाच कुटुंबात राहून देखील प्रत्येकाचा आर्थिक ताळेबंद मात्र स्वतंत्र तयार होतो. त्या ताळेबंदला कोणतेही ताळतंत्र नसते, तो ज्याच्या त्याच्या टाळेबंद कपाटात सुरक्षित ठेवलेला असतो. एकाच घरांत एकाच कुटुंबातील सदस्यांचे हे आर्थिक ताळेबंद, व्यवहार इतके कुटुंबातील इतर सदस्यांपासून सुरक्षित ठेवावे लागतात का? तसे करणे एकूणच कुटुंबीयांच्या परस्पर नातेसंबंधाच्या दृष्टीकोनातून योग्य वाटते का? अनेकदा नकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहारामुळे परस्परांमध्ये दुरावा निर्माण होत जातो, गैरसमज वाढत जातात, मतभेद व्हायला लागतात आणि कालांतराने परस्परांविषयी वैरभावना निर्माण होऊ लागते. ह्यामुळे घडत काहीच नाही परंतू सर्वच पातळीवर बिघडायला लागते. विवाहित व्यक्ती एकमेकांपासून कायमस्वरूपी विभक्त होण्याकडे वळत आहेत. काही जण तर एका वर्षाच्या आतच वेगळे व्हायचा निर्णय घेऊ इच्छितात. काही जणांमध्ये अनेक वर्षांच्या सहजीवनानंतर घटस्फोटाचे विचार मनांत यायला लागतात. अर्थात प्रत्येकाची कारणे निरनिराळी असतीलही पण एक-दोन अपत्य असलेल्या व्यक्ती देखील असा विचार जेव्हा करतात तेव्हा त्या दोघांनाही त्यांचीच अपत्य आपत्ती वाटायला लागतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### स्वधर्म हा नेक | आचरावा ||

ज्याचे मुखी नाम | रामकृष्ण हरि ||
सुख त्याचे | घरी नांदते रे ||१||
कर्मावरी ठाम | श्रद्धा असे ज्याची ||
विठ्ठलही त्याची | साथ देतो ||२||
भोंदूपणा सारा | पायदळी घेतो ||
अंतरी भजतो | पांडुरंग ||३||
नामा संगे कृती | कृती संगे भक्ती ||
तेथे आदिशक्ती | वास करी ||४||
अंती सत्य जाण | भाव शुद्ध एक ||
स्वधर्म हा नेक | आचररावा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## “निरुपण”

आधुनिक केसरी


### शुभ्रांबरी प्रिय असे

निमित्तमात्राइतुके कारण पै माझे नसे।
अक्षरेयात्राभावूके माय भरविते असे।।
ओंजळीत रसपुष्पे माझिये स्वयेचि नसे।
गंधवती वसुंधरा अनिलाचे काय असे।।
कुसुमांचिया मकरंदे भ्रमराचे काय असे।
भक्ताचिये मनछंदे भ्रामरी गे माय असे।।
शाकाचिये रसगुणे शाकंभरी माय असे।
चंद्रहासा नाही उणे शुभ्रांबरी प्रिय असे।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## भगवंताचे स्मरण हेच भक्तीचे रहस्य !




आधुनिक केसरी

'मी नाही, तू आहेस' हे जाणणे हीच खरी भक्ति होय. भक्तीचा विषय एक भगवंत ठेवला, की बाकी सर्वांचा विसर पडतो. भक्ति केली की चित्त निर्विषय होते, हे सांगावेच लागत नाही. स्वतःचे विस्मरण आणि भगवंताचे स्मरण हेच भक्तीचे रहस्य. भगवंताची प्राप्ती पाहिजे असेल तर भक्ती करावी. भगवंताच्या चरित्रात भक्तांच्या सर्व तऱ्हा आहेत. त्यामध्ये आपण कुठेतरी खासच बसू ! भगवंताने त्या सर्वांना समाधान दिले, मग ते आपल्याला का मिळणार नाही ? जग प्रगतीपर आहे हे खरे; पण पैसा, मुले, मान्यता, वगैरे ऐहिक सुखांची वाढ होणे यालाच आपण प्रगती समजतो. भगवंताची भक्ति ही खरी प्रगती होय. ही प्रगती बाहेर दिसण्यासारखी नाही. भगवंतावाचून यश हे अपयशच समजावे. कित्येक वेळा अपयश हेच यश बनते; म्हणून अपयश आले तरी, ते भगवंताच्या इच्छेने आले असे समजून शांत रहावे. 'भगवंत आहे' असे म्हणणे किंवा मानणे याचा अर्थ असा की, ही सर्व सृष्टी भगवंताने उत्पन्न केली आहे. त्या सृष्टीचे तो रक्षण आणि पालन करतो. सृष्टीमध्ये अनेक समूह आहेत, त्यांचेसुद्धा रक्षण आणि पालन तोच करतो. त्या समूहांपैकी आपण एक जीव आहोत, आणि आपलेही रक्षण आणि पालन तो सदा करीत आहे. खरे पाहिले असता प्रत्येक मनुष्य अद्वैताचाच अभ्यास करीत असतो. अद्वैतामध्ये नेणारे द्वैत आपल्याला पाहिजे आहे. भगवंत, म्हणजे सगुण परमात्मा, असा आहे की वेगळा दिसतो खरा, परंतु भक्ताला तो आपल्यासारखा करून घेतो. आई आणि मुलगा यांच्यामध्ये साम्य असते. मुलाचा आवाज आईला नेहमी गोडच लागतो, त्याप्रमाणे भक्ताचा आवाज भगवंताला गोड लागतो. शेताची राखण करण्याकरिता जसे काठीवर कांबळे घालून त्याचे सोंग करतात, तसेच सगुण उपासनेचे आहे. राखणदार हजर नसताना ते सोंग ज्याप्रमाणे शेताचे रक्षण करायला उपयोगी पडते, त्याचप्रमाणे निर्गुणाच्या अभावी परमात्म्याची आठवण करून देण्यासाठी सगुण हे उपयोगी पडते. डोंगराच्या माथ्यावर चढल्याशिवाय आपले पलीकडे असलेले गाव जसे आपल्याला दिसत नाही, तसे सगुणरूपमय झाल्याशिवाय निर्गुण होता येत नाही.

जो भगवंतावर अवलंबून आहे तोच खरा स्वतंत्र होय. भगवंताचा ध्यास लागणे म्हणजे तद्रूपच होणे होय. भगवंताची प्रीति याचेच नाव भक्ति. 'माझा त्राता, माझी काळजी घेणारा, माझे रक्षण करणारा आणि पालन करणारा तो भगवंत आहे' असे मानणे आणि तसे वागणे हीच भगवंताबद्दलची खरी अस्तित्वबुद्धी होय. आपले स्वतःवर जितके प्रेम आहे, त्याच्यापेक्षा जास्त प्रेम भगवंतावर करणे हीच खरी उपासना, आणि हेच जीवनाचे सर्वस्व होय.

२८३ . संकटांचे डोंगर अंगावर पडले तरी ज्याची वृत्ती भगवंतापासून वळत नाही , तोच खरा भगवंताचा झाला .

## मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

**जेणे मक्षिका भक्षिली जाणिवेंची।**
**तया भोजनाची रूची प्राप्ति कैंची।**
**अहंभाव ज्या मानसीचा विरेना।**
**तया ज्ञान हे अन्न पोटी जिरेना।।१५९।।**

**श्लोकार्थ :**

जाणतेपणाचा अभिमान हीच ज्ञानभोजनातील माशी, ही माशी ज्याच्या पोटात गेली त्याला भोजनाची रुचि कोठची. ही माशी लहानसहान नका समजू, ही खाल्लेले काही एक पचू द्यायची नाही. शीतन शीत सारे ओकून बाहेर पाडील तेव्हाच ती राहील.

**विवेचन : -**

मनुष्याचा जन्म होताच मनुष्याला देहबुद्धी येऊन चिकटते. देहबुद्धीचेच दुसरे नाव अहंकार आहे. अहंकाराचा लोप व्हायला लागला की मनुष्याची अध्यात्ममार्गात प्रगती सुरू झाली असे म्हणता येईल. मनुष्याच्या अंगावर माशी बसली किंवा अगदी त्याच्याजवळ जरी आली तरी मनुष्याला ते सहन होत नाही. तो हरप्रकारे तिला बाजूला सारण्याचा प्रयत्न करीत असतो. कधीकधी माशी चहात पडते, मग मनुष्य तो सर्व चहा मोरीत ओतून देतो.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

भोजन करताना चुकून एखाद्याच्या पानात माशी पडली आणि चुकून ती तोंडात गेली तर त्या मनुष्याची स्थिती काय होईल ? याची आपण कल्पना करू शकतो. एखाद्याला नावडती अशी कारल्याची भाजी खायला लागली तर त्याचा चेहरा एरंडेल प्यायला सारखा होतो. मग माशी पोटात गेली तर....

माशी पोटात गेली असा मनुष्याला नुसता भास जरी झाला तरी मनुष्याला एकतर उलटी होईल किंवा तो मनुष्य मिठाचे पाणी पिऊन उलटी काढेल...

इथे अहंकार रुपी माशी मनुष्याच्या नसानसात लपून राहिली आहे. कितीही प्रयत्न केला आणि आपल्याला साधले असे वाटते न वाटते तोच ती पटकन डोकं वर काढते.... या अहंकाराच्या पोटी अनेक मोठमोठाले लोकं धारातीर्थी पडले. असे म्हटले जाते की रामाने रावणाला मारले नाही तर त्याच्या अहंकाराने त्याचा घात केला. आपण सुज्ञ वाचक आहात, निरक्षिरविवेक कराल असा विश्वास आहे. मनुष्याला देहाचा अहंकार सर्वात जास्त असतो. काळ्या मनुष्याला काळा म्हटलं तर राग येतो, गोऱ्या मनुष्याला भुऱ्या म्हटले तर वावगे वाटते. फुटकळ गोष्टींचा मनुष्य अहंकार धरून बसतो आणि आत्मघात करून घेतो. मनुष्य ज्या देहाचा अभिमान धरतो तो कसा बनतो ते एकदा समजून घ्यावे. समर्थ दासबोधात म्हणतात, "कुश्चीळ ठाईं जन्मलें । आणि कुश्चीळ रसेंचि वाढलें। यास म्हणती थोरलें । कोण्या हिसेबें ॥३६॥ कुश्चीळ आणि क्षणभंगुर । अखंड वेथा चिंतातुर । लोक उगेच म्हणती थोर । वेडपणें ॥ ३७॥"
(दशक १५, समास ८)

ज्ञानाचे दोन भाग आहेत. लौकिक ज्ञान आणि पारलौकिक ज्ञान. आजच्या भाषेत आपण त्यास पोटार्थी शिक्षण आणि परमार्थातील शिक्षण असे म्हणू शकतो. आज पोटार्थी शिक्षणाच्या विविध शाखा आहेत, परंतु आजच्या शिक्षणातून अहंकार वाढायलाच मदत होत आहे, असे आढळून येते. व. पू. काळे यांनी एका ठिकाणी लिहिले आहे की पदवीचा कागद मनुष्याचा अहंकार वाढवितो. चांगले शिक्षण झाले तर चांगली नोकरी मिळण्याची शक्यता जास्त आणि मग स्वाभाविक पैसा जास्त. ह्या सर्व गोष्टी मनुष्याचा अभिमान वाढविण्यास मदत करतात. लौकिक शिक्षण मनुष्याची देहबुध्दी आणि पर्यायानी आपला अहंकार वाढविते. पारलौकिक शिक्षण ह्याच्या बरोबर विरूद्ध आहे. तिथे 'आतला' प्रवास आहे. इथे प्रमुख अभ्यासक्रम देहबुध्दी,अहंकार सोडून देणे हा आहे. मनुष्याचे जन्मोजन्मीचे संस्कार पटकन पुसले जात नाहीत (खरे तर ते dlt करायला हवेत), मग नको त्यावेळी ते डोके वर काढतात आणि मनुष्याचा घात होतो. कितीही अभ्यास केला, कितीही जप केला, कितीही वेळा वारी केली, तरी जोपर्यंत अहंकार समूळ नष्ट होत नाही तोपर्यंत मनुष्याची अध्यात्मात प्रगती होऊ शकणार नाही. त्यासाठी मनुष्याने अखंड सावधान राहायला हवे. अहंकारामुळे मोठे मोठे साधक भ्रष्ट झाले, आपण तर सामान्य माणसे आहोत.



# 'मन की बात' नाही तर 'तुमची मन की बात' ऐकण्यास आलो

## राहुल गांधी : शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकरांनी घालून दिलेल्या मार्गानेच भारत जोडो यात्रेचे मार्गक्रमण

आधुनिक केसरी न्यूज

**मेडशी, वाशिम** : भारत जोडो यात्रा कन्याकुमारीपासून सुरू झाली असून श्रीनगरमध्ये जाऊनच थांबणार आहे. या पदयात्रेत दररोज हजारो लोक भेटून त्यांच्या समस्या सांगतात, तरुण मुले मुली शिक्षण घेऊन नोकरीची प्रतिक्षा करत आहेत. शेतक-याच्या शेतमलाला भाव मिळत नाही. काही राजकीय पक्षाचे नेते येतात आणि मन की बात करतात पण मी तुमची मन की बात ऐकण्यास आलो आहे, असे खा. राहुल गांधी यांनी म्हटले आहे. जांबरून फाटा येथून सकाळी पदयात्रेला सुरूवात जाली आणि वाशिम जिल्ह्यातील मेडशी येथे पदयात्रेची सांगता चौकसभेने झाली, जनसमुदायाला संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांनी लोकांना जोडण्याचे काम केले. सामाजिक सौहार्द निर्माण करण्याचे काम केले, या महापुरुषांनी जाती धर्मात भांडणे लावले नाहीत, द्वेष पसरवला नाही. आम्ही सुद्धा या पदयात्रेच्या माध्यमातून त्यांनी घालून दिलेल्या मार्गानेच भारत जोडण्याचे काम करत आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानाचे रक्षण करण्यासाठी ही यात्रा आहे. ही पदयात्रा सर्वांना बरोबर घेऊन चालत आहे. शेतकरी, महिला, मुले, ज्येष्ठ नागरिक यांची जात वा धर्म न विचारता यात्रा सुरू आहे. सर्व जण एकाच ध्येयाने निघाले आहेत ते म्हणजे, नफरत छोडो, भारत जोडो.

महागाईने जनता त्रस्त आहे, बेरोजगारीने तरुणवर्ग चिंतेत आहे. शेतमाला भाव मिळत नाही म्हणून शेतकरी संकटात आहे. मोदी सरकारच्या राजवटीत कोणताही घटक समाधानी नाही. देशात समस्या मोठ्या आहेत पण नरेंद्र मोदी त्याकडे लक्ष देत नाहीत. दोन तीन लोकांसाठीच ते काम करतात. नोटबंदी व जीएसटीने सर्वांना उद्ध्वस्त केले आहे आणि काही मोजक्या लोकांचे मात्र भले केले आहे. आम्हाला मिळणारे तुमचे प्रेम व शुभेच्छा भरभरून मिळत आहेत आणि या ऊर्जेमुळेच 3500 किलोमीटरच काय, पण 10 हजार कीलोमीटरचे अंतरही आम्ही चालत जाऊ, असा विश्वास राहुल गांधी व्यक्त केला.

या सभेला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व सहप्रभारी आशिष दुआ, राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार, आ. राजेश राठोड, आ. अमित झनक, आ. डॉ. प्रज्ञा सातव, सरचिटणीस, देवानंद पवार आदी उपस्थित होते.

## अतिक्रमणावर हातोडा



औरंगाबादेत सध्या अतिक्रमण हटाव मोहीम जोरात सुरू आहे. जिल्हाधिकारी परिसरातील दर्गाहचे अतिक्रमण गुरूवारी पाडण्यात आले. छायाचित्र : संदीप घंटे

## नितीन गडकरींना भर कार्यक्रमात भोवळ

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांची पश्चिम बंगाल मधील सिलिगुडीतील दागापूर येथे एका जाहीर कार्यक्रमात आज तब्येत बिघडली. भाषण सुरू असताना अचानक त्यांना भोवळ आली. यानंतर तेथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांचे पथक कार्यक्रमस्थळी पोहचले आणि त्याच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. पश्चिम बंगाल येथील सिलिगुडीमधील विकास कामांच्या लोकार्पण कार्यक्रमाला केंद्रीयमंत्री नितीन गडकरी उपस्थित होते. गडकरींची तब्येत बिघडल्यानंतर सुकना येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांचे पथक बोलवण्यात आले. त्यांनी कार्यक्रमस्थळी येऊन गडकरी यांच्यावर प्राथमिक उपचार केले.

## लासूरस्टेशन येथे राष्ट्रीय पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** गंगापुर तालुक्यातील लासुरस्टेशन येथे बुधवारी राष्ट्रीय पत्रकार दिनानिमित्त शिल्लेगाव पोलीस ठाण्याच्या वतीने पोलीस निरीक्षक मच्छिंद्र सुरवसे,उपनिरीक्षक युसुफ शेख, पो. कॉ. हनुमंत सातपुते, उमेश गुडे, विनोद पवारसह आदींनी पत्रकाराचा शाल श्रीफळ पेन देऊन सत्कार केले. याप्रसंगी पत्रकार नवलचंद कोठारी, अशोक जैस्वाल, मकसुद शेख, आप्पासाहेब वंजारे, फिरोज मंन्सुरी, मनिष मुथा, विजय श्रीसागर, सलीम सय्यद आदींचा सत्कार करण्यात आला. दरम्यान दिवंगत अंबादास भाऊ व्यवहारे प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा माजी उपसरपंच गणेश व्यवहारे, सचिव शशिकांत सांगवीकर, अशोक मस्के, प्रशांत दाभाडे, दिनेश व्यवहारे यांनी देखील राष्ट्रीय पत्रकार दिनानिमित्त सर्व पत्रकार बांधवांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार केला आहे यावेळी अविनाश संगेकर, तुषार सराफ, विनोद जाधव, श्रीराम मढीकर यांची उपस्थिती होती.





# ॲमेझॉनमध्येही नोकरकपात




आधुनिक केसरी

ट्विटर, मेटानंतर आता ॲमेझॉननेही कर्मचाऱ्यांची कपात करण्यास सुरुवात केली आहे. नोकरीवरुन काढून टाकण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना मेलद्वारे याबाबतची पूर्वसुचना देण्यात आली आहे. दुसरी नोकरी शोधण्यासाठी कंपनीकडून या कर्मचाऱ्यांना दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. या नोकरकपातीच्या सर्वाधिक फटका 'डिव्हाइसेस अँड सर्व्हिसेस' विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बसला आहे. आठवड्याभरात ॲमेझॉनकडून विविध विभागांमधून तब्बल १० हजार कर्मचाऱ्यांची कपात केली जाण्याची शक्यता आहे. दुसरी नोकरी शोधण्यास अपयशी ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांना कंपनीकडून आर्थिक साहाय्य केलं जाणार आहे. शिवाय रोजगार मिळवण्यासाठी मदतही केली जाणार आहे. "ॲमेझॉनने प्रभावित कर्मचाऱ्यांना आधीच सुचित केले आहे. या प्रत्येक कर्मचाऱ्याला साहाय्य करण्याचा आमचा प्रयत्न असून त्यासाठी कंपनीकडून काम केलं जात आहे. नवी नोकरी शोधण्यासाठी कंपनीकडून या कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केलं जात आहे", असे कंपनीच्या अधिकृत निवेदनात 'डिव्हाइसेस अँड सर्व्हिसेस' विभागाते वरिष्ठ उपाध्यक्ष डॅव्हिड लीम्प यांनी म्हटले आहे. काही भुमिकांची कंपनीला गरज नसल्याचं सांगत प्रतिकुल आर्थिक परिस्थितीमुळे नोकरकपातीचा निर्णय घेण्यात आल्याचं लीम्प म्हणाले आहेत. दरम्यान, मेटानेही गेल्या आठवड्यात तब्बल ११ हजार लोकांना नोकरीवरुन काढून टाकले आहे. ही कपात एकूण कर्मचाऱ्यांच्या १३ टक्के आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात नोकरकपात कंपनीच्या इतिहासातील पहिलीच घटना आहे. महसुलात घट आणि वाढत्या खर्चामुळे आर्थिक नियोजन करण्यासाठी मार्क झकरबर्ग यांनी कर्मचाऱ्यांना घरचा रस्ता दाखवला आहे. याआधी ट्विटरने आपल्या साडेतीन हजार कर्मचाऱ्यांना नोकरीवरुन काढून टाकले आहे. ही संख्या कंपनीच्या एकूण कर्मचाऱ्यांच्या ५० टक्के आहे.

# राजकारणातील सूडाचा प्रवास ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**भारतीय कायद्यासमोर सर्वजण समान आहेत,असे सांगितले जाते.पण देशात एखद्या राजकीय नेत्याच्या विरोधात गुन्हा दाखल झाली की, लगेचच लोकशाही धोक्यात येते, कायद्याचा गैरवापर केला जात आहे, असा आरोप केला जातो.नेत्यांवरील आरोपाच्या समर्थनाथ पक्षाचे कार्यकर्ते कायदा हातात घेतात,रस्त्यावर उतरतात,रस्ते अडवितात.ते सामान्य माणसाला वेठीस धरतात.यामागे नेत्याची फूस असते. देशात कायदा हा राजकीय नेत्यांसाठी वेगळा आहे काय?यातराजकीय सूडातून गुन्हा दाखल केला जातोय,असा आरोप केला जातो. आता 'जे पेरले तेच उगवणार' ना! केंद्र व राज्यात सत्तात कोणत्याही पक्षाचे असो,सरकारचा तपास यंत्रणेवर दबाब असतोच,हे कोणीही नाकारू शकत नाही.**

केंद्रात काँग्रेसची पच्चावन्न वर्षे सत्ता होती,तेंव्हाही या सरकारने तपास यंत्रणेचा गैरवापर केलेला आहे.पश्चिम बंगालमध्ये कायद्याचे राज्य आहे काय? यावरविरोधी पक्षाची गुपचिळी असते.आता काँग्रेस व मित्र पक्ष ईडी व सी.बी.आय तपास संस्थेचा भाजपा सरकार गैरवापर करत आहे,अशी ओरड करत आहे.यात कांही अंशी तथ्य असू शकते.याचा अर्थ यंत्रणा शंभर टक्के गैरवापर करते असेही, म्हणणे अत्यंत चुकीचे आहे.ईडीच्या धाडीत आजकाल राजकीय नोटांचे डोंगर व बेनामी संपत्ती कशी काय सापडते आहे.सी,बी आय. ने अनेक प्रकरणे उघडकीस आणली आहेत. अजूनही लोकांचा या तपास यंत्रणेवर विश्वास आहे.या तपास यंत्रणेचा जन्म काँग्रेस राजवटीत झालेला आहे.या तपास संस्थेचा गैरवापर होऊ शकतो,हे काँग्रेसला माहित होते, तर मग ते सत्ता असताना त्या मोडीत का काढल्या नाहीत? काँग्रेस सरकारने राजकीय सूड घेण्याचा उद्देशाने गुन्हे व खटले दाखल केल्याची उदाहरणे आहेत.तेंव्हा म्हणतात ना! 'जैशी करणी वैसी भरणी' आता काँग्रेस मित्र ते त्यांना विरोधकांना आरोपातून पळ काढता येणार नाही.राजकारणात नेत्यावर गंभीर आरोप होत असतात,ते काही नवीन नाही.देशात स्वच्छ चारित्र्याच्या नेत्यांनी आरोप होताच नैतिकता म्हणून प्रथम पदाचा त्याग केल्याची उदाहरणे आहेत.आता निस्वार्थी नेते असणे राजकारणात दुर्मिळ चालले आहेत. आता राजकारण हे लबाड, कपटी,भ्रष्ट, गुन्हेगार प्रवृत्तींचा अड्डा बनत चालला आहे.जनताही अशाच प्रवृत्तीच्या माणसाला निवडून देत असते. नेत्याला आरोपाच्या विरोधात कायदेशीर न्याय मागता येतो, त्यासाठी हाच सनदशिरमार्ग आहे.पण आरोप होताच नेते राजकीय गोंधळ घालतात, रस्ते रोखणे,यातून न्याय मिळतो काय? हा लोकशाहीत मार्ग आहे काय ?काँग्रेस सरकारने तर भाजपा नेत्यांचे राजकीय जीवनच उध्वस्त आणण्याच्या उद्देशाने खोटे गुन्हे,बनावट खटले दाखल केल्याचा प्रकरणे आहेत.यातील महत्वाचे म्हणजे गुजरातमध्ये २००२ मध्ये दंगल घडली.या दंगलीचे समर्थन होऊ शकत नाही.यात दोन्ही बाजूने निष्पाप लोकांचा बळी जातो.पण काँग्रेसने गुजरात दंगलीचे राजकीय भांडवल केले.तत्कालिन मुख्यमंत्री मोदीवर दंगलीचा कट केल्याचा आरोप केला. इतकेच नव्हे, २०१० मध्ये विशेष तपास यंत्रणेने (SIT ) चौकशीसाठी तत्कालीन मुख्यमंत्री मोदी यांना चौकशी बोलाविले होते.ही देशातील पहिलीच घटना असावी.त्यावेळी मोदी लाकडी खूर्चीं १९ तास बसले, त्यांनी ७२ प्रश्नांची शांतपणे उत्तरे दिली.तेंव्हा मोदींनी राजकीय गोंधळ घातलेला नव्हता.त्याप्रमाणे २००५ मध्ये कुविख्यात गुंड दहशवादी, गुंड सोहराबुद्दीन, तुळशीराम प्रजापती पोलिस चकमकीत ठार मारले गेले. पण चममक बनावट होती,असे म्हणत काँग्रेसने घटनेला राजकीय वळण दिले.यात भाजपा नेते अमित शहा यांचेवर अपहरण, हत्या,पुरावे नष्ट करण्यासारखे गंभीर गुन्हे दाखल केले.यात शहा यांचे सह राज्याचे पोलिस महासंचालक तसेच इतर ३८ वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून खटला दाखल गेला.यात शहा यांना तर अटक करून तुरूंगात टाकले. इतकेच नव्हे,त्यांना गुजरात राज्यातून दोन वर्षासाठी बाहेर करण्याची कारवाई केली गेली.या दोन्ही खटल्यात न्यायालयाने मोदी व शहा यांना निर्दोष ठरविले.इतकेच नव्हे, त्यांचेवर दाखल केलेली बनावट रचण्यात आल्याचे म्हंटले आहे.आता गुजरात दंगल प्रकरणी नरेंद्र मोदींना फाशी व्हावी,याच उद्देशाने सामाजिक कार्यकर्त्या तिस्ता सेटलवाड यांचेसह दोन वरिष्ठ दर्जाच्या आय.पी.एस दर्जाचे अधिकारी आर.बी. श्रीकुमार,राज्याचे माजी पोलिस महासंचालक संजीव भट्ट यांनी बनावट पुराव्यासाठी मदत केल्याचे उघड झाले आहे. यातील दोन वरिष्ठ पोलिस अधिकारी अजूनही जेलची हवा खात आहेत. तेंव्हा काँग्रेस सरकारला सामाजिक कार्यकर्त्या म्हणून तिस्ता सेतलवाड पुळका होता. तीला २००७ पद्यश्री तसेच राजीव गांधी सदभावना पुरस्कार दिला गेला. इतकेच नव्हे 'सबरंग' या तिच्या संस्थेला १ कोटी ४ लाख आर्थिक मदत केली.या निधीचा मोदी विरोधात वापर कसा गेला? तेंव्हा काँग्रेस पक्षाने सुडाचे राजकारण केले नाही काय? दुसरीकडे ईडीने भ्रष्टाचाचाराच्या आरोपाची चौकशीसाठी नेते सोनिया गांधी व राहूल गांधी यांना बोलावले असताना याच काँग्रेस नेत्यांनी दिल्लीत रस्त्यावर धुडगूस घातला.देशात सर्वसामान्यावर तर खोटे गुन्हे दाखल करण्याच्या अनेक प्रकरणे आहेत. भारतातील मोठे शास्त्रज्ञ व इस्त्रोचे अधिकारी एस.नंबी नारायणन यांना १९९६ मध्ये संरक्षण दलातील गुप्त माहिती पुरविली,असा ठपका ठेवत सी.बी.आय ने अटक केली होती.समाजाने त्यांना 'गद्दार' म्हणून हिणवले,त्यांच्या कुटुंबाला खूप यातना सोसव्या लागल्या.त्यांच्या पत्नीच्या मनावर परिणाम झाला.एका देशातील मोठ्या शास्त्रज्ञाच्या सुखी कुटुंब उध्वस्त करण्याचा प्रयत्न झाला.यातून त्यांची १९९८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने निर्दोष मुक्त केले.पण त्यांनी स्वतः वर लागलेला 'हेरगिरी'चा कलंक पुसण्यासाठी २२ वर्षे न्यायालयीन संघर्ष केला.२०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने केरळ सरकारला बदनामी व नुकसान भरपाई म्हणून त्यांना ५० लाख रुपये देण्याचे निर्देश दिले.पुढे भाजपा,मोदी सरकारने त्यांना २०१९ मध्ये 'पद्मभूषण' सन्मानित केले. पण हे षडयंत्र रचणाऱ्यावर कारवाई झाली काय? याचे उत्तर मिळालेले नाही.यावर 'रॉकेस्ट्री' चित्रपट निघालेला आहे.देशात शीख यात्रेकरूंना पोलिसांनी गाडीतून गोळ्या घालून ठार मारल्याची देशात मोठी घटना घडली होती. यात खटल्यात नंतर पोलिसांना शिक्षा झाली.तसेच देशात आदिवासी,दलित समाजावर,सामान्य माणसावर खोटे गुन्हे दाखल करणे,हत्या करण्याच्या घटना घडलेल्या आहेत.सामान्य कार्यकर्ता व माणसावरही गटातटातून परस्पर विरोधी' खोटे गुन्हे पोलिस यंत्रणेकडून गुन्हे दाखल केले जातात.तेंव्हा त्यांनी न्यायासाठी रस्त्यावर उतरावयाचे का? राष्ट्रवादी काँग्रेसने नेते जिंतेंद्र आव्हाड यांचे राजकारण दादगिरीचे करणे अशीच ख्याती आहे.यापूर्वी त्यांच्या विरोधात यापूर्वी गुन्हे दाखल झालेले आहेत.परवा काही दिवसापूर्वी "हर हर महादेव' या चित्रपटाच्या खोटा इतिहास दाखविला जात आहे,असा म्हणत त्यांच्या समर्थकांनी चित्रपट गृहात घुसून प्रेक्षकांना मारहाण केली.या घटनेवरून त्यांचे विरोधात गुन्हा दाखल झाला होता. चित्रपटातून जर इतिहास खोटा इतिहास दाखविला जात असेल तर न्यायालयात याचिका दाखल करून चित्रपटावर बंदीची मागणी करता आली असती.ते न करता नेते आव्हाड व त्यांच्या समर्थकांना कायदा हातात घेण्याची परवानगी आहे काय? इतिहास खरा किंवा खोटा हे राष्ट्रवादी काँग्रेस ठरविणार काय?त्यांनी इतिहासाचे आपल्या मनाप्रमाणे पुनर्रलेखण करून घ्यावे.आव्हाडांच्या या कृत्याचे खा. सुप्रिया सुळे यांनी समर्थन केले.त्यांनी तर महाराष्ट्र सरकारला 'ब्रिटीश राज,ची उपमा दिली.मग महाविकास आघाडीचे सरकार असताना दोन पत्रकार,तसेच सोशल मिडियावर आक्षेपार्ह टिप्पणी केली,म्हणून तुरूंगात टाकले.यातील एका तरूणाच्या हातात बेड्या घातल्या गेल्या.तेंव्हा कायद्याचे राज्य होते का? न्यायालयाने फटकारले तेंव्हा राष्ट्रवादी नेत्यांची दातखिळी बसली होती काय? राज्यात राजकीय आंदोलनातील नेत्यांना अटक करणे, नंतर त्यांना सोडून दिले जाते,ही पोलिस यंत्रणेची कारवाईची पध्दत आहे.मग अमरावतीचे श्रीमती नवनीत राणा लोकप्रतिनिधी होत्या.त्यांनी केवळ शिवसेनेला आणि सरकारला आव्हान दिले,म्हणून ना ? महाविकास आघाडी सरकारने'देशद्रोहाचा' गुन्हा नोंदविला? त्यांना तुरूगांत टाकले. तेंव्हा ब्रिटीश राज नव्हते काय? लोकशाहीचा गळा घोटला गेला नाही, असे वाटले नाही?राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्वतःन्यायपालिकेची भूमिका बजावत आहे.कोण निर्दोष ? दोषी कोण ? याचा निवाडा तेच करत आहेत.याच पक्षाने नबाब मालिक, अनिल देशमुख या दोघांना निर्दोषत्व बहाल करून टाकलेले आहे.सेनेचे राऊत यांना अटक केली प्रकरणात ईडीने बेकायदेशीरपणे केली,असे न्यायालयाने असे स्पष्ट म्हंटले आहे. यामुळे भाजपा पक्षाचे व तपास यंत्रणेचे नाक कापले गेले आहे.राऊत यांची कायद्याच्या तांत्रिक कारणामुळे सुटका झाली आहे.याचा अर्थ मध्यवर्गीयांचे घरांचे स्वप्न धुळीला मिळविले गेले नाही काय? याचे उत्तर ते देणार नाहीत.मराठी कुटुंबाला देशोधडीला लागवे गेले,याचे उध्दव सेनेला खेद अथवा दुःख वाटत नाही.पण निर्लज्जपणे स्वागत केले जात आहे.आता राजकारणात भ्रष्ट व्यक्तींचा सन्मानाने मिरवणूक काढण्याची किळसवाणी प्रथा सुरू झालेली आहे.उद्या न्यायालयाच्या किचकट प्रक्रियेतून,पुराव्याअभावी चोर, लुटारू तर सुटला तर त्यांचे स्वागत होईल.मग आश्चर्य वाटायला नको! आव्हाड यांच्या विरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला.यावरून राजकीय गोंधळ माजविला गेला,आदळआपट झाली.आव्हाडांनी तर आमदारकीचा राजीनामा देण्याची धमकी दिली. त्यांनी नैतिकता म्हणून आमदारकीचा राजीनामा राज्यपालाकडे दिला असता.त्यांनी राजीनामा देण्याचे केवळ नाटक केले.यातील घटनेची चित्रफीत पहाता ते महिलेला ढकलून देत आहेत,असे दिसून येते.यावरून सकृतदर्शनी तरी घटना ही विनयभंगाची वाटत नाही.पण कायदा का म्हणतो ?तक्रादाराने जर लेखी तक्रार दिली की ती प्रथम नोंद करून घेतली गेली पाहिजे.फौजदारी दंड संहिता कलम १४५ अंतर्गत दखलपात्र असेल तो नोंदविणे बंधनकारक आहे. महिलेने विनयभंगाची लेखी तक्रार दिली.ती पोलिस अधिकाऱ्याने प्रथम नोंदवून घेतली.त्यात पोलिसांनी त्यांचे कर्तव्य बजावले आहे.त्यांनी जर नोंद केली नसती तर हे प्रकरण अंगलट आले असते. राज्य सरकार थेट पोलिसांना तक्रार दाखल करून घेवू नका,असा निर्देश देऊ शकत नाही. महाराष्ट्रात शासन हस्तक्षेपाचे प्रकरण सरकारच्या अंगलट आले होते,तत्कालिन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांनी सावकारी प्रकरणात नेत्याबाबत पोलिस स्टेशनला दुरध्वनी केला होता. पोलिस अंमलदाराने त्याची स्टेशन डायरीत नोंद केली. प्रकरण न्यायायालयात गेले,तेंव्हा राज्य सरकारला १० लाखाचा दंड ठोठावला. यात पुढे काय झाले? हे माहित नाही.पण प्रकरणातील तक्रारदार राजकीय व्यक्ती आहे.तीने तक्रार दाखल करू नये,यासाठी मन वळविता आले असते. यात राजकारण आडवे आलेच!याचे कारण राज्यात सत्ताधारी व विरोधी पक्षात मधूर सबंध राहिलेले नाहीत.देश व महाराष्ट्रातील राजकारणात इतकी कटूता निर्माण झाली आहे की, राजकीय नेते टोकाची भूमिका घेत आहेत.राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना नेते मुजोरपणाने वागलेले आहेत,त्याचा परिणाम आहे.तेंव्हा तत्कालिन गृहमंत्री जयंत पाटील यांनी तर "कायदा आपले करतो'असे म्हणाले होते,तेंव्हाही पोलीस यंत्रणेवर राजकीय दवाब आणला गेला होताच!केवळ प्रथम तक्रार नोंदविली गेली म्हणजे आरोपी होत नाही,तो आरोप सिध्द करावा लागतो.खोटा एफ. आय. आर. ची नोंद झाली असेल तर फौजदारी दंड संहिता कलम ४८२ अन्वये न्यायालयात त्यात दाद मागता येते व तो एफ. आय. आर. रद्द केला जाऊ शकतो.तेंव्हा राष्ट्रवादी काँग्रेस नेते आव्हाड व त्यांना पक्षाच्या नेत्यांना हा सल्ला दिला नाही.यात पक्षाचे तत्कालिन गृहमंत्री जयंत पाटील,नेते अजित पवार यांनी कायदाबाबत अज्ञानपणाच दाखविला.या प्रकरणाचे राजकीय भांडवल म्हणून गोंधळ केला जात असेल तर योग्य! राज्यात कालचा राजकारणातील गोंधळ बरा होता! अशी म्हणण्याची वेळ आली आहे.महाराष्ट्रात शाहू, फुले, आंबेडकरांचे विचार म्हणजे हि विचारांची लढाई आहे.पण राष्ट्रवादी काँग्रेसची भाषा विचाराची,कृती मात्र दडपशाहीची आहे.यातून तेच विचाराला छेद देत आहेत.

# द पीपल्स पोस्ट दलित पँथर विशेषांक




सुशील म्हसदे, पुणे
संपर्क क्र.: ९९२१२४१०२४

आधुनिक केसरी

**दलित पँथरची स्थापना १९७२ मध्ये झाली होती. माझ्या माहितीप्रमाणे दलितांच्या प्रश्नावर संघर्ष करणारी ही संघटना होती. दलित पँथर ही स्वातंत्र्योत्तर काळातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर दलित चळवळीला लढाऊ स्वरूप देण्याचा प्रयत्न करणारी संघटना होती. दलित पँथर चा उदय का झाला यासाठी मी शरण कुमार लिंबाळे यांनी संपादित केलेल्या दलित पँथर या पुस्तकाचा संदर्भ इथे देतो आहे. या पुस्तकांमध्ये काही विचारवंतांची मते आहेत ती मुद्दाम मी इथे नमूद करू इच्छितो. जेणेकरून दलित पँथर या संघटनेबद्दल , ध्येय धोरणाबद्दल अधिक स्पष्टता होईल. जातिव्यवस्था व दलितांवरील अत्याचाराविरुद्ध चीड या अंतर्विरोधातून दलित पँथरचा जन्म झाला- नागेश चौधरी. दलितांवरील वाढत्या त्याच्यामुळे दलित तरुणांमुळे पसरलेला असंतोष आणि रिपब्लिकन पक्षातील जुन्या नेतृत्वाबद्दल त्यांचा झालेला भ्रमनिरास यामधून दलित पँथरची स्थापना झाली. -नलिनी पंडित.**

दलित पॅंथरच्या स्थापनेला आता ५० वर्षे पूर्ण झालेली आहे. त्यानिमित्ताने महाराष्ट्रभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्यासोबतच दलित पॅंथरवर माहितीपर पुस्तके, स्मरणिका, विशेषांकदेखील मोठ्या प्रमाणात प्रकाशित झाले आहे. या पुस्तकांच्या, स्मरणिकेच्या माध्यमातून आजच्या पिढीला पँथरच्या कार्याचा आढावा घेणे खूप सोयीस्कर झाले आहे. असाच दलित पँथर वरील विशेषांक माझ्या वाचण्यात आला तो म्हणजे, द पीपल्स पोस्ट या पाक्षिकाचा जुलै २०२२ चा विशेष अंक जो पँथरची पन्नाशी नावाने प्रकाशित झाला आहे. त्यामध्ये एकूण ११ लेख विविध मान्यवरांनी लिहिलेले आहेत जे दलित पँथरच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकतात. डॉ. गोपाळ गुरू यांनी दलित पँथर चा चिकित्सा करणारा लेख लिहिला आहे. दलित पँथर च्या कार्याचा उल्लेख तर केलेलाच आहे ;पण त्याचबरोबर पँथरच्या वैचारिक भूमिकेतील उणिवा ही दाखवून दिल्या आहेत. वैचारिक भूमिकेच्या उणिवेमुळे दलित पँथर चा पराभव झाला ,असे रोखठोक लिखाण त्यांनी केलेले आहे. राजा ढाले आणि नामदेव ढसाळ यांच्या दलित पॅंथरबाबत असणाऱ्या भूमिकेचाही आढावा या लेखात घेण्यात आलेला आहे. उत्तम कांबळे यांचा लेख आपल्या सर्वांना विचार करायला लावणार आहे. दलित पॅंथर सारखी एवढी प्रबळ संघटना तिचीसुद्धा कशी फाटाफूट झाली, याचे सविस्तर विवेचन करणारा हा लेख आहे. आपल्या सर्वांसाठी तर हा लेख उपयुक्त आहेच; पण खास करून राज्यशास्त्राचे अभ्यासक, राजकीय विश्लेषक यांनाही हा लेख उपयुक्त आहे. या लेखाच्या सुरुवातीला लेखांनुरूप छायाचित्रे दिलेली आहेत त्यामुळे लेख अजून मुळातून सविस्तरपणे समजायला खूप सोपा जातो, असे मला वाटते. मल्लिका अमर शेख यांचा लेख म्हणजे थोडक्यात कार्यकर्त्यांच्या पत्नीची व्यथाच आहे ,असेच मी म्हणेन. कार्यकर्त्याची पत्नी होणे वाटते तेवढी सोपे काम नाही. पाक्षिकातील सर्वच लेख खूप वाचनीय आणि अभ्यासपूर्ण आहेत. त्या काळातील घडामोडींचा अचूक वेध या पाक्षिकामध्ये घेण्यात आला आहे. बरीच दुर्मिळ छायाचित्रेसुद्धा यात बघायला मिळतात. प्रत्येकाने संग्रही ठेवावा असाच हा अंक आहे.




हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# काटा आणि वाटा



दुशांत बाबुराव निमकर
संपर्क क्र. 9765548949

आधुनिक केसरी

**मानवी जीवनासह पृथ्वीवर वावर असलेल्या सर्व जीवांना जगण्यासाठी संघर्ष करावाच लागतो.जीवनात नंदनवन फुलविणाऱ्या व्यक्तीच्या समोर समस्या आवासून उभ्या असतात. कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असले तरी समस्या मात्र आपली पाठ सोडत नाही ज्याप्रमाणे आपली सावली पाठ सोडत नाही अगदी त्याचप्रमाणे समस्या जीवन जगतांना भेडसावत असतात.समस्या अनेक असतात. जिथे जिथे समस्या उद्भवतात तिथेच समस्येचे समाधान,उपाय असतात पण आपण समस्येवर मात करण्यासाठी प्रयत्न न करता भीतीचे काहूर मनात निर्माण करतो.**

मनाने हरलेला मनुष्य कितीही धडधाकड असला तरी खचलेला दिसतो म्हणून मन खंबीर ठेऊन समस्येला डोक्यावर न घेता डोकं लावून सोडविण्याचा प्रयत्न करायला हवे. समस्या प्रत्येकालाच असतात. त्याचे भांडवल न करता सोडविण्याची क्लुप्ती, युक्ती, वृत्ती बदलायला हवी. बगिच्यात गेल्यानंतर तेथील फुलझाडांचे निरीक्षण केल्यास विविध सुंदर फुलांमध्ये देखील काटे विखुरले असतात म्हणून फुलझाड फुले उगविणे सोडत नाही तसेच मनुष्याच्या जीवनात देखील भरपूर काटे/समस्या असतात म्हणून त्यावर निराश, हताश, उदास न होता काट्यातून वाटा शोधण्याची शोधक दृष्टी मानवाने निर्माण करायला हवी. जगाचा पोशिंदा असलेला बळीराजाला असंख्य समस्या असतात. एखादे वर्षी शेतात उत्पन्न कमी झाले म्हणून शेती करणे सोडून देत नाही.' झाली तर शेती नाहीतर माती' असं माहीत असून देखील मनातून न खचता नव्याने उभारी घेऊ पाहतो.शेतकऱ्याला नांगरणी,वखरणी,बी-बियाणे,खते, शेतमजूर यांची नेहमीच वानवा असतो तरीदेखील मन घट्ट ठेऊन दरवर्षी जुगार खेळतच असतो.प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतीत सिंचनाची सोय नाही, पावसाच्या पाण्यावर शेती अवलंबून असते.कधी कोरडा दुष्काळ तर कधी ओल्या दुष्काळाने बळीराजा होरपळून निघत असतो पण जिद्द,चिकाटी,ध्येय न सोडता अविरत शेतीत घाम गाळत असतो.शेतीत येणाऱ्या प्रत्येक समस्येला तोंड देत,परिस्थितीशी झगडत तटस्थपणे उभा असतो.यावर्षी शेतीमध्ये झालेली अपरिमित हानी म्हणजे निसर्गाचा लहरीपणा,अवकाळी पाऊस,पूरजन्य परिस्थिती यामुळे शेतकऱ्यांच्या वाटेत काटेच पेरले आहे की काय?? अशी स्थिती निर्माण झाली आहे तरी देखील काट्यातून नवीन वाटा निर्माण करण्याची जिद्द बळीराज्याकडून शिकायला हवं. शासनाने शेतीसाठी बऱ्याच योजना आणल्या असल्या तरी त्या तोडक्याच आहेत.शेतीसाठी राबविणाऱ्या योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याने व पारंपरिक पद्धतीने शेती करावी लागत असल्याने खूप समस्या सध्या तरी दिसते आहे तरी या समस्यांचे बळीराजा भांडवल न करता निमूटपणे आपला शेतीचा व्यवसाय उदरनिर्वाह करण्यासाठी चालवत असतो हे प्रकर्षाने सांगावे वाटते. आपल्या भारत देशात लोकसंख्या भरमसाठ वाढलेली आहे.१३० कोटी जनतेच्या देशात प्रचंड बेरोजगारी वाढलेली आहे.रोजगार मिळविण्याच्या हेतूने तरुण-तरुणी



शहराकडे धाव घेत असल्याची चित्र दिसून येते.शेती व्यवसायात हंगामी रोजगार मिळतो त्यानंतर मात्र रिकामं राहावं लागते त्यामुळे आपला संसाररथ चालविण्यासाठी रोजगार मिळविणे क्रमप्राप्त आहे म्हणून औद्योगिक नगरीत धोक्याच्या ठिकाणी काम करणारे मजूर आणि त्यांच्या समस्या देखील अनंत आहेत. मागील दोनवर्षांपूर्वी कोरोना या जागतिक महामारीने डोकं वर काढले आणि कित्येक बळी हे जग सोडून निघून गेले तरी शहरीकरणाकडे मजुरांचा ओढा कमी झालेला दिसून येत नाही कारण समस्या कितीही असल्या तरी मार्ग त्या ठिकाणी कळतो.'इच्छा तिथे मार्ग' असं म्हटलं तरी चालेल.कामगारांना/मजुरांना कारखान्यात कधी मालकांकडून तर कधी ज्यादा तास काम करवून घेतले जाते.वेळेवर पगार,बोनस दिल्या जात नाही तरी त्यावर अंकुश ठेवण्यासाठी संघटनात्मक लढा देण्यास व न्यायहक्क मिळविण्यासाठी कामगार संघटना देखील आग्रही आहेत म्हणून असलेल्या काट्याला वाट्यातून तोडण्याची शृंखला राखण्यासाठी कामगाराने सतर्क राहण्याची प्रतिज्ञा घेतलेली आहे. अगदी त्याचप्रमाणे समस्येची साखळी तोडून नवीन वाटा शोधायला हवे.

जग खूप सुंदर आहे.या जगात जगतांना नेहमी सकारात्मक विचार करायला हवे.प्राचीन काळात स्त्रियांना दुय्यम स्थान होते.स्त्री ही केवळ उपभोगाची वस्तू समजली जायची,'चूल आणि मूल' एवढ्यावरच बंदिस्त ठेवल्या जात होते.त्यांना बाहेर पडता येत नव्हते आणि शिक्षणाची तर दारेच बंद होती. या प्रथेला छेद देत सवित्रीमाईने शिक्षणक्रांती घडविली.त्यापूर्वी अहिल्याबाई होळकर,राजमाता जिजाऊ,फातिमा शेख,रमाई यासारख्या असंख्य महिलांनी वाईट प्रथा,परंपरेचा प्रखर विरोध करून असलेल्या समस्या सोडविल्या.आज भारतीय संविधानाने स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य स्वीकारले असले तरी आजही स्त्री बंधनातून मुक्त झालेली दिसून येत नाही.अंतराळात झेप घेणारी स्त्रीला देखील विविध समस्येला सामोरे जावे लागत आहे.वाईट नजरा,विनयभंग,लैंगिक अत्याचार,बलात्कार,छळ,ॲसिड हल्ला यासारखे कृत्य समाजात घडून येत आहे म्हणजेच स्त्रियांच्या समस्या देखील अजूनही सुटलेल्या नाहीत.समाजात जीवन जगत असतांना क्षणोक्षणी महिलांची होणारी गळचेपी ही लाजिरवाणी बाब असली तरी मनाने खंबीर असलेल्या स्त्रियांनी या समस्येचे भांडवल केले नाही.स्त्री ही अबला नसून सबला आहे हे त्यांच्या मनावर कोरलेले आहे.या समस्येचे डोंगर बाजूला सारून घरातील व घराबाहेरील कार्य समाधानाने करीत असल्याचे दिसून येते.हे केवळ त्यांना येणाऱ्या समस्येला तोंड देत त्यावर उपाययोजना योजल्या आहे.

लोकशाही अस्तित्वात असलेल्या प्रत्येक देशातील कर्मचारी हा देशाच्या विकासाचा कणा समजला जातो.देशाची/राज्याची धोरणे प्रत्यक्ष राबविण्याची कार्य कर्मचारी करीत असतो.कर्मचारी आपल्या वयाची ३० ते ३५ वर्ष सेवा केल्यानंतर म्हातारपणात शासनाने पेंशन देणे गरजेचे आहे पण १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शनपासून वंचित ठेवले गेले आहे म्हणून कर्मचाऱ्यात पेंशन धारक व पेन्शनविहिन कर्मचारी असा भेद निर्माण केला गेला आहे. नव्या कर्मचाऱ्यांना सेवेत असतांना वेतन मिळते म्हणून जगणे सहजशक्य होईल पण सेवा निवृत्तीनंतर पेंशन नसल्याने जगणे मुश्किल होणार आहे त्यामुळे ही समस्या सर्वांसाठी असल्याने पुढील काळात सेवेत येणाऱ्या सर्वांना जुनी पेन्शनला मुकावे लागणार आहे म्हणून सर्व कर्मचारी,संघटना,सामाजिक संघटना एकत्र येऊन चळवळ उभी व्हायला हवी व आपला हक्क म्हणजे जुनी पेंशन मिळवण्यासाठी यावर सर्वोपरी प्रयत्न केले पाहिजे. समस्या आहे म्हणून रडत बसण्यापेक्षा लढत राहणे हे कधीही सोयीस्कर व उचित राहते.जन्माला आलेल्या प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या समस्या उद्धभवत असतात म्हणून समस्येला गोंजारत बसू नका तर समस्या कशी सोडवायची ? आणि कशी सुटेल ? यासाठी विचारमंथन करून पुढील मार्ग ठरवायला हवा.अडचणींचा काटा आपल्या आयुष्यात आल्यानंतर त्यावर मात करणाऱ्या अनंत वाटा असतात त्याच शोधण्याचे कौशल्य प्रत्येकाने निर्माण केल्यास अडचणीची वाट सुकर झाल्याशिवाय राहणार नाही.

# कोण आला रे, कोण आला ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883


आधुनिक केसरी

**बाळ केशव ठाकरे ऊर्फ बाळासाहेब ठाकरे हे महाराष्ट्रातील शिवसेना पक्षाचे संस्थापक, राजकारणी व व्यंगचित्रकार होते. सामना या मराठी दैनिकाचे ते संस्थापक तथा मुख्य संपादकही होते. त्यांची हिंदुहृदय सम्राट म्हणूनही लोकांच्या हृदयांवर छाप उमटली आहे. हा वाचा, अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा त्यांच्या स्मृती जागविणारा माहितीपूर्ण लेख...**

बाळासाहेबांनी दि.१९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना केली. त्यांच्या मते समाज सुधारकांची समृद्ध परंपरा असलेला महाराष्ट्र पुरोगामी आहे, परंतु मराठी माणूस मागेच राहिला. महाराष्ट्रात सुविधा आहेत, मात्र मराठी माणूस दुविधेतच. महाराष्ट्रात उद्योग आहेत, पण मराठी तरुण बेरोजगार! तर महाराष्ट्रात पैसा आहे, परंतु मराठी माणूस गरीब आहे.

महाराष्ट्राला भारतात मान आहे, मात्र मराठी माणूस महाराष्ट्रातच प्रामुख्याने मुंबईत अपमानित होत आहे. शिवसेनेचा पहिला मेळावा याच वर्षी ३० ऑक्टोबरला शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. ज्यात लाखो लोकांचा सहभाग होता. या मेळाव्यापासूनच त्यांची आणि शिवतीर्थावरील- शिवाजी पार्कवरील मराठी माणसांची गर्दी यांच्यामध्ये नातेसंबंध प्रस्थापित होण्यास सुरुवात झाली. त्यांनी सर्वप्रथम एक व्यंगचित्रकार म्हणून सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. इ.स.१९५०मध्ये ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. पुढील काळात त्यांनी ज्येष्ठ व्यंगचित्रकार आर.के. लक्ष्मण यांच्यासमवेतही काही काळ काम केले. फ्री प्रेस जर्नलमध्ये काम करीत असतानाच ते विविध संस्था, कंपन्या व नियतकालिके यांसाठी चित्रे, व्यंगचित्रे, जाहिरातीचे डिझाइन अशी कामे करीत असत. त्यांच्या व्यंगचित्रात इंदिरा गांधींची व्यक्तिरेखा आवडती होती.

बाळासाहेबांचा जन्म महाराष्ट्र राज्यातील मराठी विद्या व संस्कृती यांचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरात दि.२३ जानेवारी १९२६ रोजी झाला. हिंदूंच्या पूजापाठ व अंधश्रद्धावर कडाडून प्रहार करणारे प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे हे त्यांचे वडील आणि रमाबाई या त्यांच्या प्रेमळ मातोश्री होत. महाराष्ट्राचे सांप्रत मुख्यमंत्री मा.उद्धवजी ठाकरे हे त्यांचे सुपुत्र तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मा.राजजी ठाकरे हे त्यांचे पुतणे आहेत. महाराष्ट्रातील राजकारणात बाळासाहेबांचा



प्रचंड दबदबा निर्माण झाला होता. झुणका भाकर केंद्रांची योजना, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बेचे मुंबई नामकरण अशा अनेक योजना-प्रकल्पांची मूळ संकल्पना ही त्यांचीच होती. व्हॅलेंटाईन डेसारख्या पाश्चिमात्य उत्सवांना विरोध, परप्रांतीयांच्या तसेच बांगलादेशींच्या विरोधातील आंदोलने यांमागचा विचारही त्यांचा होता. त्यामुळेच त्यांना महाराष्ट्राचा वाघ असे संबोधले जात होते. आज त्यांच्या जयंतीच्या मंगल प्रसंगी समस्त कार्यकर्ते व शिवसैनिक "कोण आला रे, कोण आला? महाराष्ट्राचा वाघ आला!" अशा आरोळ्या ठोकत त्यांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होतात.

बाळासाहेबांनी नोकरी सोडून स्वतःचे व्यंगचित्रात्मक साप्ताहिक काढण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार त्यांनी ऑगस्ट १९६०मध्ये मार्मिक हे साप्ताहिक सुरू केले. साप्ताहिकास मार्मिक हे नाव त्यांना वडील प्रबोधनकारांनीच सुचविले होते. मराठीतील हे पहिले व्यंगचित्र साप्ताहिक ठरले. तेव्हा संयुक्त महाराष्ट्र स्थापन झालेला असतानाही प्रामुख्याने मुंबईत मराठी माणसावर अन्याय होत होता. या प्रश्नाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रात येऊन मराठी माणसाबद्दल अनादर बाळगणाऱ्यांना त्यांनी व्यंगचित्रांच्या माध्यमातून टीका केली. इ.स.१९६०पासून ते राष्ट्रीय व महाराष्ट्र राज्य स्तरावरील प्रत्येक महत्त्वाच्या घडामोडीत, तसेच इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर मराठी लोकांना मार्गदर्शन करत. ते श्याम या बालपाक्षिकाचे सुद्धा संपादक होते. वक्तृत्वाबरोबरच ठाकरे भेदक लेखन देखील करत. प्रबोधनकार केशव ठाकरे व प्रल्हाद केशव अत्रे यांचा प्रभाव त्यांच्या लेखनात जाणवतो. शिवाय व्यंगचित्रकाराची वेधक-वेचक निरीक्षणदृष्टीही त्यांच्यामध्ये होती. सामना हे केवळ शिवसेनेचे मुखपत्र आहे, ज्यात संपादक म्हणून बाळासाहेबांचे अग्रलेख असत.


बाळ ठाकरे हे हिंदुत्ववादी होते. बॉंबस्फोट, देशविघातक कृत्ये घडवणाऱ्या धर्मांधांना या देशात राहण्याचा अधिकार नाही. मतपेटीचे राजकारण करत अशा मुस्लिमांचे लांगुलचालन कोणी करू नये. भारताला आपला देश मानणाऱ्या राष्ट्रवादी मुस्लिम लोकांना आपला कोणत्याही प्रकारचा विरोध नाही, असे विचार त्यांनी मांडले. हिंदुत्ववादी भूमिकेमुळे त्यांना शिवसैनिकांनी हिंदुहृदय सम्राट अशी पदवी दिली. त्यांनी दिलेली गर्व से कहो, हम हिन्दु है, ही घोषणाही त्यांच्या राजकारणाचा महत्त्वाचा भाग होती.

बाळासाहेब ठाकरे यांना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन दि.१७ नोव्हेंबर २०१२ रोजी मुंबईतील मातोश्री या निवासस्थानी त्यांनी चिरनिद्रा घेतली. त्यांच्या पश्चात बरोबर दहा वर्षांनी एकसंध प्रबळ शिवसेनेचे दोन गट पडले आहेत. हे बघून त्यांच्या आत्म्याला असह्य वेदना झाल्या नसतील कशावरून?

# संत चोखामेळा

आधुनिक केसरी

असा उपरोधिक प्रश्न ते देवालाच विचारतात. 'का म्हणून आम्ही या यातना सहन करावयाच्या, भगवंताच्या लेखी सर्व त्याचीच लेकरे आहेत ना, मग असा दुजाभाव का?' असे प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होऊन ते व्यथित होताना दिसतात. त्यांच्या अभंगरचना हृदयाला भिडणाऱ्या आहेत. त्यांना भोगावे लागलेले दुःख, त्यांची झालेली अक्षम्य उपेक्षा, मानसिक छळ याचे पडसाद भावविभोरतेसह त्यांच्या काव्यरचनेत अभिव्यक्त झालेले दिसून येतात. संत चोखामेळांचे सुमारे ३५० अभंग सध्या उपलब्ध आहेत. त्यांचे अभंग लिहून घेण्याचे काम 'अभ्यंग अनंतभट्ट' हे करत असत, असा उल्लेख काही संशोधक करतात. चोखामेळांविषयी बऱ्याच आख्यायिका आहेत चोखामेळा हे मुळचे बुलढाणा जिल्ह्यातील मेहुण या गावचे रहिवाशी. ते उदरनिर्वाहासाठी पंढरपूरी शके १२०० साली आले. पंढरपूरी आल्यानंतर त्यांना विठठल भक्तीत दंग झाले. ते सदैव पांडुरंगाचे नामस्मरणात व भजनात रंगून जायचे. त्यावेळी मंगळवेढे नगरी भरभराटीस आली होती.



शके १२६० ला मंगळवेढ्यातील वेशीच्या तटाची भिंत कोसळली होती. व तिचे बांधकाम करण्यासाठी पंढरपूरचे मजूर आणण्यासाठी दूत पंढरपूरी आला. आणि त्या मजुरासोबत चोखामेळा तटाच्या भिंतीचे बांधकाम करण्यासाठी सहकुटुंब मंगळवेढ्यास आले. संत चोखामेळा हे प्रापंचिक गृहस्थ. ते उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करत, पण ते विठ्ठलाच्या नामात सतत दंग होते.त्यांच्या कुटुंबातील सर्वच जण हरिभक्ती परायण होते. त्या सर्वांचे श्रीविठ्ठलावर अनन्यसाधारण प्रेम होते. त्यांची पत्नी सोयराबाई हिचे बाळंतपण स्वतः विठाई माऊलीने नणंदेचे रूप घेऊन केले अशी कथा प्रचलित आहे. संत चोखामेळांचा मुलगा कर्ममेळा हा पण संत परंपरेत आहे. सोयराबाई व कर्ममेळा यांच्याही काही सुंदर अभंग- रचना आहेत. संत चोखामेळांचे मेव्हणे बंका महार व बहीण निर्मळा यांच्याही काही उत्तम रचना आहेत. संत चोखामेळांच्या भक्तीची उंची फार मोठी होती. ते स्वतःला 'विठू पाटलाचा बलुतेदार, म्हणून समजत असत. गावगाड्यातील शिवाशिवीच्या वातावरणात त्यांचा श्वास कोंडला जात होता. दैन्य, दारिद्र्य, वैफल्य यांमुळे ते लौकिक जीवनात अस्वस्थ होते. किल्ल्याच्या पूर्वेकडील वेशीचे बांधकाम चालू असता ते एकाएकी कोसळले व त्याखाली श्री चोखामेळाराया आणि अनेक मजूर मयत झाले ही घटना शके १२६० म्हणजे इ.स. १३३८ मध्ये वैशाख वद्य पंचमीस झाली. पुढे श्री संत नामदेव महाराज हे मंगळवेढ्यास आले व ज्या अस्थिमधून विठ्ठल विठ्ठल असा आवाज होता त्या अस्थि श्री चोखामेळारायांच्या आहेत असे ओळखून त्यांनी त्या पंढरपूरी विठठल मंदिरापुढे सध्या नामदेव पायरी जवळ समाधी बांधली.

# औरंगाबाद औद्योगिक क्षेत्रात आगामी काळात मोठी गुंतवणूक

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उद्योगांना आवश्यक असणारे उद्योगस्नेही वातावरण देण्याचे काम राज्य सरकार करत असून येत्या काळात औरंगाबाद आणि राज्याच्या विविध भागात मोठी गुंतवणूक करण्यासाठी उद्योजक पुढे येत आहेत. त्यांना आवश्यक ते सर्व सहकार्य राज्य शासन करेल आणि त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीला चालना मिळेल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.
सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी औरंगाबाद परिसरात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या तसेच उद्योग विस्तार करू इच्छिणाऱ्या उद्योजकांसोबत चर्चा केली. केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड, उद्योगमंत्री उदय सामंत, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, ऑरिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश काकाणी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा, विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह यांच्यासह उद्योग विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.
यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्य शासन राज्यात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या उद्योजकांना आवश्यक ते सर्व सहकार्य करेल आणि ज्या ज्या सोयीसुविधा उपलब्ध करून देणे शक्य आहे त्या उपलब्ध केल्या जाईल. ज्या उद्योजकांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत, त्यावर येत्या पंधरा दिवसात निर्णय घेण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधितांना देण्यात आले आहेत. महाराष्ट्र हे गुंतवणुकीसाठी उद्योजकांच्या पसंतीचे राज्य आहे. त्यामुळे राज्यात उद्योगासाठी आवश्यक सुलभ वातावरण देणे, उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक परवानग्या शक्य तितक्या कमी वेळात देणे या बाबींना आमचे प्राधान्य आहे.



उद्योग समूहांकडून नव्याने प्रस्ताव आल्यास त्यावर तत्काळ निर्णय घेण्यात येईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. यावेळी चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष नितीन गुप्ता, मानद सचिव अर्पित सावे, उद्योग प्रतिनिधी अथर्वेश नंदावत, एथर एनर्जीचे संचालक मुरली शशिधरन, पिरामल फार्मा सोल्युशन्सचे वरिष्ठ उपाध्यक्ष मयंक मट्टू, कॉस्मो फर्स्टचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक अशोक जयपूरिया आदी उपस्थित होते.

# भारत जोडो यात्रेत युवकांनी घेतला स्वयंस्फूर्तीने सहभाग



आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते खासदार राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रा सुरू केली.नांदेड जिल्ह्यात यात्रा दाखल होताच तालुक्यातील बहूसंख्य पदाधिकारी, युवक, कार्यकर्ते यांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवून यात्रेला हातभार लावल्याची माहिती बाजार समितीचे सभापती तथा कॉंग्रेस कमेटिचे तालूका अध्यक्ष जगदीश पाटील भोसीकर यांनी दिली आहे. मागील अनेक वर्षांपासून कॉंग्रेस पक्षाला नवी उभारी मिळत नसल्याने पक्षातील चैतन्य लोप पावत असल्याचे चित्र निर्माण झाले होते. यातुन सावरण्यासाठी पक्षाने बराच आटापिटा केला पण फारशी प्रगती झाली नाही.अनेक राज्यात पराभव पत्करावा लागला होता याची सल सतत बोचत होती यातून सावरण्यासाठी पक्षाचे नेते खासदार राहुल गांधी यांनी "भारत जोडो यात्रा" काढण्याचा संकल्प केला नव्हे तर प्रत्येक्ष कन्याकुमारी पासून पदयात्रेला प्रारंभ केला. सदरील पदयात्रा तेलंगणातून महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील देगलुर तालूक्यातून जाणार असल्याने माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी यात्रेच्या स्वागतासाठी जय्यत तयारी सुरू केली आणि सूयोग्य नियोजन करून  वेगळी छाप पाडली आहे.भोकर विधानसभा मतदारसंघ हा अशोक चव्हाणांचा असल्याने जास्तीत जास्त पदाधिकारी, यूवक, कार्यकर्ते यांचा यात्रेत सहभाग असावा म्हणून दोन महिने अगोदर पासून "फिल्डिंग" लावली होती. आमदार अमरनाथ राजूरकर, जिल्हा अध्यक्ष गोविंद शिंदे नागेलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली बाजार समितीचे सभापती तथा काँग्रेस कमेटिचे तालूका अध्यक्ष जगदीश पाटील भोसीकर, माजी कृषीसभापती बाळासाहेब पाटील रावणगावकर, प्रकाश देशमुख भोसीकर, नागनाथ घिसेवाड, गोविंद बाबा गौड पाटील, नामदेव आयलवाड, भगवान दंडवे, विनोद पाटील चिंचाळकर, रामचंद्र मुसळे, गणेश राठोड, अप्पाराव राठोड, शिवाजी देवतुळे,माधव अमृतवाड, मारोती बल्लाळकर, बी.आर. पांचाळ, आत्रीक पाटील मूंगल, केशव पाटील पोमनाळकर, उज्वल केसराळे, मिर्जा ताहेर बेग, मनोज गीमेकर, बाबूराव आंदबोरीकर यांच्यासह अन्य कार्यकर्ते परिश्रम घेऊन तालुक्यात वातावरण निर्मिती केली. यात्रा नांदेड जिल्ह्यात येताच तालुक्यातील बहूसंख्य पदाधिकारी, युवक, कार्यकर्ते यांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवून यात्रेला हातभार लावला आहे.जिल्हापरिषद, सर्कल व गाव निहाय कार्यकर्ते यात्रेत सहभागी झाले होते अशी माहिती जगदीश पाटील भोसीकर यांनी दिली आहे.

# गोंडपिपरीनगरीत रंगणार २० नोव्हेंबरला काव्यमैफिल

## दिग्गज कवींची उपस्थिती आकर्षक ठरणार; अध्यक्ष धनंजय साळवे, उदघाटक सुधाकर अडबाले

आधुनिक केसरी न्यूज

**गोंडपिपरी :** जीवन गौरव मासिक प्रणित जीवन गौरव साहित्य परिवार (म रा) व शब्दांकूर फाऊंडेशन,चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गोंडपीपरी सारख्या अतिशय दुर्गम भागात प्रथमच विदर्भस्तरीय मराठी काव्यसंमेलनाचे आयोजन दिनांक २० नोव्हेंबर २०२२ रोज रविवारला उद्धव नारनवरे साहित्य मंच, धनोजे कुणबी समाज सभागृह,गोंडपीपरी येथे आयोजन करण्यात आले आहे. सदर कविसंमेलनाचे उदघाटक मा.सुधाकर अडबाले,सरकार्यवाह विदर्भ माध्य.शिक्षक संघ व कविसंमेलनाध्यक्ष धनंजय साळवे गटविकास अधिकारी, गडचिरोली विशेष अतिथी श्रीकृष्ण अर्जुनकर मु.का.अ. गृहलक्ष्मी महिला सहकारी पतसंस्था गडचिरोली, चेतनसिंह गौर नगरसेवक,राजेश ठाकूर सामाजिक कार्यकर्ते चामोर्शी, चेतन ठाकरे प्रवचनकार, गझलकार रज्जाक शेख, ग्रामीण कवी आनंदा साळवे अहमदनगर, लोककवी विजय ढाले, 'दाखलखारीज'कार नरेशकुमार बोरीकर, सौ. रेखाताई कारेकर राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षिका, स्वागताध्यक्ष प्रा. संतोष बांदूरकर जनता कनिष्ठ महा.गोंडपीपरी यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.यात ज्येष्ठ साहित्यिक उद्धव नारनवरे यांना साहित्य सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे तसेच साहित्य लेखन गौरव पुरस्कार,पुस्तक प्रकाशन सोहळा मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहे.या विदर्भस्तरीय कविसंमेलन तीन सत्रात पार पडणार असून पहिल्या सत्रात निमंत्रित कवींची व नंतर सहभागी कवींची काव्यमैफिल रंगणार आहे. सर्व निमंत्रित व सहभागी कवी/कवयित्री यांना सन्मानचिन्ह, पुस्तक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. सदर संमेलनाचे सूत्रसंचालन अर्चना जिडकुंठावार, वंदना डगवार हे करणार आहे.
या विदर्भस्तरीय मराठी कविसंमेलन यशस्वी करण्यासाठी गणेश कुंभारे, दुशांत निमकर यांच्या मार्गदर्शनात प्रा. भारत झाडे, उमेन्द्र बिसेन, अर्चना धोटे, संभाशिव गावंडे, वृषाली जोशी, तानाजी अल्लीवार यांच्या संयोजनात होणार आहे तसेच सदर कविसंमेलन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी जीवन गौरव साहित्य परिवाराचे डॉ. हितेंद्र धोटे, विकास सुखधाने, विलास गजापुरे इत्यादी पदाधिकारी व शब्दांकूर फाऊंडेशनचे राजेश्वर अम्मावार,किशोर चलाख, राकेश शेंडे, सुशांत मुनगंटीवार, उज्वल त्रिनगरीवार,सूरज दहागावकर, देवानंद रामगिरकर, रेखा गायकवाड,राहुल पिंपळशेंडे, विनोद पोगुलवार, सुचिता जिरकुंठावार,गणेश पिंपळशेंडे, अक्षय उराडे, विनोद देवगडे, बळीराज निकोडे, नितीन चापले, नितेश चुनारकर, मुकेश पिंपळशेंडे, सचिन दळवी, नंदिनी पिंपळकर,अरुण कुत्तरमारे, शीतल अकोजवार, अश्रका कुमरे, अमृता पोटदुखे, रामेश्वर पातसे,दीपा राखावार, ॲड.रुपेश सूर,सुनील सातपुते, झुंगा कोरडे, सुदर्शन भोगेकर इत्यादी पदाधिकारी अथक परिश्रम घेत आहे.

# पंतप्रधान आत्मनिर्भर योजनेचा लाभ घ्यावा : नगरपरिषद वैजापूर

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** नगर परिषद वैजापूरमध्ये फेरीवाला धोरण सुरु आहे या मध्ये कोरोनामध्ये अनेकांचे रोजगार बुडाले.फेरीवाले,पथविक्रेते,छोटे व्यवसायिक आर्थिक संकटात सापडले.त्यातून सावरण्यासाठी त्यांना प्रधानमंत्री स्वनिधी योजनेंतर्गत 10 हजारापर्यत कर्ज उपलब्ध करून दिले.आता प्रमाणिकपणे कर्जाची परतफेड करणाऱ्याना दुसऱ्या टप्यात 20 हजार तर तिसऱ्या टप्यात 50 हजाराचे कर्ज दिले जाणार आहे.
नगर परिषद वैजापूर अध्यक्षा सौ शिल्पाताई परदेशी व उपाध्यक्ष साबेर खान अमजेद खान यांनी या योजनेचा सर्व लाभार्यानी लाभ घ्यावा आसे आवाहन केले आहे  जे लाभार्थी 10 हजार रु कर्ज घेण्याचे राहिले असतील त्यांनी ऑनलाईन अर्ज करावा. योजनेचा लाभ पथविक्रेते ,भाज्या विक्रेते,रस्त्याच्या कडेचे दुकानदार यांना होणार आहे.शहरामध्ये या आर्थिक वर्षात 700 फेरीवाल्यांना दहा हजार रुपयांपर्यंत विनातारण खेळते भाडवल एका वर्षासाठी उपलब्ध करून देण्यासाठी पीएम स्वनिधी योजना सुरु केली .परतफेड करण्याच्या वृतीला प्रोत्साहन म्हणून 7 टक्के प्रतिवार्षिक दराने व्याज उपलब्ध आणि डिजिटल व्यवहाराला प्रोत्साहन म्हणून प्रतिवर्ष एक हजार 200 रुपयापर्यत कशबक देण्यात येणार आहे .रकमेची वेळेवर परतफेड केल्यास आणि व्यवहारात डिजिटल पेमेंट केल्यास व्याज माफ होणार आहे.
या लोकांना स्वावलंबी आणि सशक्त बनविणे हा पीएम स्वनिधी योजनेचा उद्देश आहे.योजनेत 7 टक्के व्याज अनुदानही मिळते.कर्ज घेतल्यास व वेळेपूर्वी परत केल्यास व्याज त्याच्या बँक खात्यात अनुदान म्हणून जमा केले जाते.ज्यांनी दहा हजार रुपयाचे लाभ घेतला अश्यांना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान योजनेचा लाभ दिला जाईल व शासनाचे वेगवेगळ्या योजनेचा लाभ देण्यात येईल आसे नगर परिषद वैजापूर चे मुख्याधिकारी ,बी,यु बिघोत यांनी आवाहन केले आहे. तसेच नगर परिषद वैजापूर चे सर्व सन्मानीय सदस्य यांनी वैजापूर शहरातील सर्व फेरीवाले लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा आश्या सुचना देण्यात आल्या.लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करा. पीएम स्वनिधी हि योजना कोरोना काळात



डबघाईस आलेल्या व्यावसायिकानी स्वावलंबी व सशक्त बनविण्यासाठी आहे.योजनेचा गरजू,होतकरू पथविक्रेत्यांनी लाभ घ्यावा तसेच ज्यांनी पहिला टप्पा दहा हजार,दुसरा 20 हजार, आज रोजी तिसरा 50 हजार रुपये याच्या टप्पा नगर परिषद वैजापूर याना नीलमकुमार संतोष लाडगे यांना देण्यात आला आहे. नियमित परतफेड केल्यास 1200 रुपये कशबक मिळेल.नोदणीकृत फेरीवाल्याना लाभ घ्यायचा असल्यास त्यांनी नगर परिषद वैजापूर कक्षास सुनील भाग्यवंत स.प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटक दिवाकर त्रिभुवन यांना भेट देऊन ऑनलाईन अर्ज करावा करण्याचे आवाहन केले आहे.

# स्वाभिमानीच्या ऊस तोडबंद आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद :** दि.१७ व १८ नोव्हेंबरला संपूर्ण राज्यात स्वाभिमानी शेतकरी पक्षाने ऊसतोड बंद आंदोलन पुकारले आहे. त्यानुसार आज कादवा सहकारी साखर कारखान्याच्या गेटवर स्वाभिमानीचे प्रदेशाध्यक्ष संदीप जगताप यांच्या नेतृत्वात ऊस बंद आंदोलन करण्यात आले. संपूर्ण राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात ऊसाच्या वजनात काटेमारी केली जात आहे. या काटेमारी विरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी आवाज उठवला. महाराष्ट्रातील संपूर्ण साखर कारखान्यांचे वजनकाटे हे ऑनलाईन झाले पाहिजे. यासाठी साखर आयुक्त कार्यालयावर मोठा मोर्चा निघाला. या मोर्चाचा धसका घेऊन साखर आयुक्तांनी राज्यातील सर्व साखर कारखान्याचे काटे ऑनलाईन करण्याचा निर्णय घेतला. परंतु एक रक्कमी एफ.आर.पी आणि इतर मागण्यांसाठी आंदोलन सूरु आहे. नाशिक जिल्ह्यातील कादवा व वसाका या साखर कारखान्यांनी या आंदोलनाला अधिकृत पाठिंबा देऊन दोन दिवस ऊस तोडणी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला व आंदोलनाला सक्रिय पाठिंबा दिला. इतर साखर कारखान्यांनी अधिकृत पाठिंबा दिला नसला तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात ऊस तोडी न घेतल्यामुळे आज नाशिक जिल्ह्यातील सर्व साखर कारखाने ठप्प झाले. कादवा कारखान्यावरील आंदोलनात स्वाभिमानीचे प्रदेशाध्यक्ष संदीप जगताप यांनी शेतकऱ्यांना ऊसाच्या मिळणाऱ्या पैशाचे तुकडे करण्याचा घाट केंद्र आणि राज्य सरकार यांनी संगनमताने घातला आहे. कारखान्यांकडुन इथेनॉल ६० रुपये लिटर खरेदी करून तेच पेट्रोल ११० दराने विकले जाते. साखर जीवनावश्यक नसतांना निर्यातबंदी केली जाते. सन २०२१-२२ हंगामात गाळपास गेलेल्या उसासाठी एफआरपी अधिक २०० रूपये अंतिम भाव मिळावा. राज्यसरकारने त्यासाठी ऊस दर नियंत्रण समिती स्थापन करून आरएसएफ प्रमाणे येणारा भाव देण्यासाठी साखर कारखान्यांना आदेश द्यावेत. राज्य सरकारने एफआरपीचे दोन तुकडे करण्यासाठी ऊस दर नियंत्रण अद्यादेशमध्ये केलेली दुरूस्ती त्वरीत मागे घेऊन येणाऱ्या हिवाळी अधिवेशनामध्ये पुन्हा दुरूस्ती करून एकरकमी एफआरपी देण्याचा कायदा करावा. तोपर्यंत साखर कारखान्यांनी गेल्या वर्षीच्या सरासरी उताऱ्याच्या आधारावर या सिझन मध्ये म्हणजेच सन २२-२३ च्या हंगामामध्ये एकरकमी एफआरपी द्यावी. ऊस तोडणी मजूर हे स्वर्गीय गोपीथ मुंडे महामंडळामार्फतच मजूर पुरवावेत. जोपर्यंत हा निर्णय होणार नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून अथवा कारखान्याकडून महामंडळाने वर्गणी वसुल करू नये. केंद्र सरकारने ६० लाख टन साखरेच्या निर्यातीस परवानगी दिलेली आहे. अजून तीस लाख टन साखर निर्यातीस परवानगी द्यावी. तसेच निर्यातीस कोटा सिस्टिम न लावता ओपन जनरल लायसन (ओजीएल) अंतर्गत जे पहिले निर्यात अतील त्यांना यात यावे. सरकारने दिलेला कोटा संपेपर्यंत मुक्त परवाना द्यावा. केंद्र सरकारने साखरेची किंमत ३५०० रूपये प्रतिकिंटल निश्चित करून इथेनॉलच्या किमतीमध्ये प्रतिलिटर ५ रूपयांची वाढ करावी या मागण्या आंदोलनात करण्यात आल्या आहेत. यावेळी सहकार नेते सुरेश डोखळे, स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे पाटील, राजू शिरसाठ, परशराम शिंदे, गंगाधर निखाडे, सचिन बर्डे, नरेंद्र जाधव, कुबेर जाधव यांनी मनोगते व्यक्त केली. या आंदोलनात सुरवातीपासून कादवाचे अध्यक्ष श्रीराम शेटे यांनी स्वतः सहभाग घेतला. गेटवर येऊन निवेदन स्वीकारले तसेच कारखाना बंद ठेवून पाठिंब्याचे पत्र दिले तसेच जास्तीत जास्त पहिली उचल शेतकऱ्यांना देण्याचे आश्वासन दिले. तर या आंदोलनाला दत्तात्रये कावळे, सुनील मातेरे, प्रशांत कड, आत्माराम पगार, संजय पाटोळे, ललित जाधव, रामकृष्ण जाधव, गजानन घोटेकर, सचिन खालकर, संदीप वडजे, रवींद्र शेवाळे, वैभव जगताप, नामदेवराव चिने, निवृत्ती मातेरे, भाऊसाहेब मातेरे, बाळासाहेब जगताप, संदीप उफाडे, नारायण संधान, प्रभाकर मोरे, शंकर फुगट, संदीप वडजे, परशराम संधान, पांडुरंग गणोरे, वाळू फुगट, शाम जगताप, विश्वास संधान, बाजीराव धुमने यांसह संघटनेचे पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.



आंदोलनात असणाऱ्या मागण्या केंद्र सरकार व काही मागण्या राज्य सरकार यांच्याशी संबंधित आहे. आज राज्यभरातील शेतकऱ्यांनी एकजूट दाखवली. राज्यभर साखर कारखाने उभे राहिलेत. केंद्र व राज्य सरकारने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यांकडे लक्ष दिले नाही तर दोन्ही सरकारांना याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. नाशिक जिल्ह्यातील कादवा व वसाका या साखर कारखान्यांनी शेतकरी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी ऊस तोड दोन दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. आम्ही दोन्ही कारखान्याच्या प्रशासनाचा व येथील शेतकऱ्यांचे आभार मानतो. तसेच इतर कारखान्यांनी पाठिंबा अधिकृत जाहीर केलेला नसला तरी शेतकऱ्यांनी स्वतः मोठया प्रमाणात तोड बंद ठेऊन नाशिक जिल्ह्यातील कारखाने आज उभे केले आहे. अशीच एकजूट नाशिकच्या शेतकऱ्यांनी पुढेही दाखवली तर कोल्हापूर प्रमाणे आपल्यालाही एकरकमी ३ हजार रुपये प्रमाणे भाव मिळेल. पण संघर्षासाठी संघटन होणे गरजेचे आहे.

**– संदीप जगताप, प्रदेशाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना**

# कृषी विभागामार्फत तितूर येथे रब्बी बीजप्रक्रिया प्रात्यक्षिकाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात तितूर येथे रब्बी बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक आयोजन सोयगाव कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले. रब्बी पिक उत्पादकता वाढ मोहिमे अंतर्गत हरभरा बियाण्याचे बिज प्रक्रिया प्रात्यक्षिक राबविण्यात आले. यावेळी कृषि सहाय्यक ललिता साळवे यांनी हरभरा प्रति 10 किलो बियाण्यास 100 ते 200 मि.ली. महा एन.पि.के. जिवाणू संघ बियाण्यास लावावे असे सांगितले. बीज प्रक्रिया केल्याने जमिनीतून पिकांच्या मुळावर येणारी बुरशी थांबते. त्यामुळे मुळ्यांचा जमिनीत विकास होऊन अन्नद्रव्ये चांगल्या प्रकारे घेऊ शकतात. परिणामी पिक जोमाने वाढते एकंदरीत उत्पादनात दहा ते पंधरा टक्क्यांनी वाढ होण्यास मदत होते अशी माहिती कृषी सहाय्यक ललिता साळवे यांनी दिली व शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक करून दाखविले. यावेळी गावातील सरपंच, उपसरपंच, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अखिल भारतीय हिंदू गोर बंजारा व लभाना - नायकडा समाज कुंभ एक चिंतनाचा लाभ घ्यावा

## जयप्रकाश चव्हाण यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** गोद्री, तालुका जामनेर जिल्हा जळगांव येथे २५ ते ३० जानेवारी २०२३ या कालावधीत "अखिल भारतीय हिंदू गोर बंजारा व लभाना- नायकडा समाज कुंभचे" आयोजन करण्यात आलेले आहे. आपल्या समाजात जेंव्हा जेंव्हा मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते तेंव्हा समाजातून वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रिया उमटत असतात. या कार्यक्रमाबद्दलही समाज माध्यमातून पुढे येत आहेत. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा अशे आवाहन भाजपा जिल्हा उपध्याक्ष जयप्रकाश चव्हाण यांनी केले आहे. बहुतांश प्रतिक्रिया या अपूर्ण महितीच्या आधारेच येत आहेत.

जसे की- पोहरादेवी येथील महंतांना विचारले नाही, गोर धाटी संस्कृती नष्ट होणार आहे, पोहरादेवीचे अस्तित्व नष्ट करण्याचे षडयंत्र आहे, पोहरादेवीला कार्यक्रम का घेतला नाही ? यांना का विचारले नाही, त्यांना का विचारले नाही, अमुक मंत्र्याला का विचारले नाही. या कुंभमुळे समाजाचे कोणते प्रश्न सुटणार आहेत ? या कार्यक्रमाला मदत करण्यामागे आरएसएसचा हेतु काय ? कुंभ काय आपली संस्कृती आहे काय ? असे अनेक प्रश्न विचारले जाणार आहे या अखिल भारतीय



हिंदू गोर बंजारा व लबाना - नायकडा समाज कुंभ २०२३ मध्ये २५ ते ३० जानेवारी गोद्री ता जायन येथे चाळीस एक्कर शेतात आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाची आढावा बैठक उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झाली आहे. या मुंबईत बैठकीत मंत्री संजय राठोड, गिरीश महाजन, उपस्थित होते. या कार्यक्रमाला देशभरातून येणारे अतिथी, संत,भाविक भक्त यांची गैरसोय होऊ नये म्हणून वीज,रस्ते, पाणी, वैद्यकीय सुविधा व सुरक्षा व्यवस्था चोख ठेवण्यात येणार आहे. कोणत्याही प्रकारची अतिथी यांची गैरसोय होणार नाही. हा कुंभ चांगल्या पद्धतीने पार पडेल याची खात्री प्रशासनाने घ्यावी अशे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत सर्व पदाधिकारी यानां दिले आहे अशी माहिती भाजपा जिल्हा उपध्याक्ष जयप्रकाश चव्हाण यांनी जेष्ठ पत्रकार गोकुलसिंग राजपूत याच्याशी बोलताना सांगितले.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नादरपूर येथे बाल दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** भारताचे माजी पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू (चाचा नेहरू)यांच्या जयंतीनिमित्त "बाल दिन" साजरा करण्यात आला.बालदिना निमित्त शाळेत विविध कार्यक्रम घेण्यात आले. त्यांत प्रामुख्याने शालेय विद्यार्थ्यांच्या चित्रकला स्पर्धा,रांगोळी स्पर्धा,वकृत्व स्पर्धा इ.कार्यक्रम घेण्यांत आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीयुत बाबुराव रंगराव निकम व प्रमुख पाहुणे म्हणून सन्माननीय श्रीयुत दिलीप साहेब( प्रशासन अधिकारी जि.प.औरंगाबाद) हे होते.कार्यक्रमास माजी सरपंच श्रीयुत गणेश बाबा निकम,श्रीयुत कारभारी पा.निकम,गावांतील प्रतिष्ठित नागरिक,शाळेचे मुख्याध्यापक ,शाळेचे सर्व शिक्षकवृंद हजर होते. याप्रसंगी शाळेतील बालकांना गोड भात व वाटप करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीयुत रामहरी निकम सर यांनी तर आभारप्रदर्शन श्रीमती ज्योती गवांदे मॅडम यांनी केले.



आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# सरकारला 'भारत जोडो यात्रा' रोखावी वाटत असेल तर रोखावी

## राहुल गांधी : सावरकरांच्या बाबतीत सत्य आहे तेच बोललो; त्यात चुकीचे काय ?

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** भारत जोडो यात्रा हा एक विचार आहे, प्रवास आहे. शेतकरी, कष्टकरी, तरुण, दुकानदार सर्वांच्या समस्या, वेदना, व्यथा लोक या पदयात्रेत मांडत आहेत. ही पदयात्रा देश जोडण्याच्या उदात्त हेतूने निघाली आहे. पदयात्रेतून प्रेमाचा संदेश दिला जात आहे, द्वेष पसरवला जात नाही, असे असतानाही जर सरकारला ही पदयात्रा रोखावी असे वाटत असेल तर त्यांनी खुशाल रोखावी, असे खा. राहुलजी गांधी यांनी परखडपणे सांगितले.
भारत जोडो यात्रेदरम्यानची राहुलजी गांधी यांची ही सहावी पत्रकार परिषद चानी फाटा वाडेगाव, जिल्हा अकोला येथे पार पडली. यावेळी ते पुढे म्हणाले की, देशात एक द्वेष पसरवणाऱ्यांची विचारधारा आहे तर दुसरी विचारधारा देश जोडणाऱ्यांची आहे. द्वेष पसरवून देश भक्कम कसा होतो ? त्यामुळे तर देश कमजोर होतो. विविधतेत एकता ही या देशाची ओळख आहे, ही ओळख कायम ठेवण्यासाठी, देश जोडण्यासाठी कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत ही पदयात्रा जाणार आहे. महाराष्ट्रात या पदयात्रेला मोठा प्रतिसाद मिळाला व यातून मला खूप काही शिकायला मिळाले. महात्मा गांधी यांनी देशातून वर्धा येथेच राहण्याचा विचार का केला असावा? याचे उत्तर मला या विदर्भाच्या भूमित आल्यानंतर कळले. खरी काँग्रेस विदर्भात, महाराष्ट्रात आहे. काँग्रेसच्या विचारांची ही भूमी आहे.
सावरकर यांच्याबाबत मी जे वक्तव्य केले होते त्यात चुकीचे काहीच बोललो नाही, जे ऐतिहासिक सत्य आहे तेच मी मांडले, हे सांगताना राहुलजी गांधी यांनी सावरकर यांनी ब्रिटीश सरकारला लिहिलेले पत्र दाखवून त्यातील काही मजकूरही वाचून दाखवला. महात्मा गांधी, पंडित नेहरू, सरदार पटेल यांनाही इंग्रजांनी अनेक वर्ष तुरुंगात डांबले होते पण त्यांनी ब्रिटीश सरकारला पत्र लिहून आपली सुटका करुन घेतली नाही. हा या दोन विचारधारेतील फरक आहे. एक गांधींची विचारधारा तर दुसरी सावरकरांची.
देश तुटलेला नाही तर मग भारत जोडो पदयात्रेची गरज काय असा प्रश्न भाजपा करत आहे.पण मागील ८ वर्षात देशातील वातावरण पूर्णपणे बदलेले आहे.जनतेचा आवाज ऐकला जात नाही,



शेतकरी, तरुण, कष्टकरी यांचा आवाज सरकार ऐकत नाही. संसदेत विरोधकांना बोलू दिले जात नाही. देशात अनेक समस्या आहेत पण त्या सरकार ऐकून घेत नाही, द्वेष, हिंसा पसरवून भीतीच्या सावटाखाली जनतेला ठेवले जात आहे. स्वायत्त संस्थांवर सरकारचा दबाव आहे. न्यायपालिकाही यातून सुटलेल्या नाहीत अशा परिस्थितीत जनतेचा आवाज ऐकण्यासाठी ही भारत जोडो यात्रा आहे. दररोज हजारो लोक त्यांच्या व्यथा, वेदना, समस्या मांडत आहेत, त्यासाठीच ही पदयात्रा आहे.
शेतकरी आत्महत्यांसंदर्भात उत्तर देताना राहुलजी गांधी म्हणाले की, शेतकरी आत्महत्या ही फक्त विदर्भातील समस्या नाही तर देशभरातील शेतकऱ्यांची समस्या आहे. शेतकरी आत्महत्या रोखायच्या असतील तर देशाला अन्नधान्य पुरवणाऱ्या या बळीराजाला आधार देण्याची, मदत करण्याची, त्याच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याची गरज आहे. शेतकऱ्यांचे रक्षण करणे सरकारची जबाबदारी आहे. युपीए सरकार असताना शेतकऱ्यांचे कर्जमाफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली होती पण आता केंद्रातील भाजपा सरकार शेतकऱ्यांचा आवाज ऐकत नाही, त्यांना मदत देणे तर दुरची बाब आहे. तरुणांच्या बाबतीतही तीच परिस्थिती आहे. तरुण मुले मुली शिक्षण घेत आहेत. शिक्षणावर खर्चही जास्त होत आहे पण इंजिनिअरिंग शिकणाऱ्या विद्यार्थ्याला आपण इंजिनिअर होऊच याची खात्री नाही. या समस्यांकडे सरकार लक्ष देत नाही हे जनतेच्या लक्षात आले आहे असेही राहुलजी म्हणाले.
राहुलजी गांधी यांनी ४० मिनिटे पत्रकारांच्या विविध प्रश्नांना उत्तरे दिली. या पत्रकार परिषदेला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, मीडिया विभागाचे प्रमुख जयराम रमेश, प्रभारी एच. के. पाटील, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व महाराष्ट्राचे सहप्रभारी आशिष दुआ, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, प्रवक्ते डॉ. राजू वाघमारे, कपिल ढोके, डॉ. सुधीर ढोणे आदी उपस्थित होते.



# आनंदी जीवनाचा मार्ग म्हणजे आर्ट ऑफ लिव्हिंग : वर्षा दीदी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहरातील उपविभागीय कार्यालय च्या बाजूला असलेल्या गंगागिरी धर्माशाळा या ठिकाणी आर्ट ऑफ लिविंगच्या हॅप्पीनेस कोर्स चे 9 नोव्हेंबर ते 13 नोव्हेंबर या कालावधीत वर्षा दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. यात जगप्रसिध्द सुदर्शन क्रिया तसेच आनंदी, निरोगी व तणावमुक्त जीवन कसे जगावे याबाबत अनेक क्रिया व्यायाम तसेच खेळ अश्या माध्यमातून हा कोर्स उत्साही वातावरणात संपन्न झाला. यात साक्षी साखरे, प्रिती मराठे, नेहा वैश्नव, प्रिया मराठे, दिगंबर भुसारे, हेमंत हिरण, रजनी भुसारे, संकेत टेके, अर्चना राजपुत, सचिन टेके, सुनिल गायकवाड, साक्षी टेके, सचिन टेके आदींनी लाभ घेतला.



औरंगाबाद येथील शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी ( दि. १५) एनसीसीचा रायझिंग डे ऑफ साजरा करण्यात आला. यानिमित्त महाविद्यालयात निबंध, चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमास कर्नल किशोर भागवत यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्राचार्य आर. एच. सातपुते, प्रा. प्राची गिरी यांची उपस्थिती होती.

# शेतीत ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी प्रयत्न करणार

## कुलगुरू डॉ. इंद्रमणी : राज्यस्तरीय कृषि प्रदर्शनाचे उद्‌घाटन




आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी कृषि विद्यापीठ प्रयत्नशील आहे. ड्रोन तंत्रज्ञानाबाबत युवकांना प्रशिक्षण देण्यात येत असून शेतीत ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी यांनी आज केले. कृषि तंत्र विद्यालय, केव्हीके येथे आयोजित राज्यस्तरीय कृषि प्रदर्शनाच्या उद्‌घाटन कार्यक्रमाप्रसंगी कुलगुरू डॉ. इंद्रमणी बोलत होते. यावेळी विधानसभेचे माजी अध्यक्ष आमदार हरिभाऊ बागडे, आमदार सतीश चव्हाण, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, विस्तार शिक्षण संचालक डॉ. डी. बी. देवसरकर, विभागीय कृषि सहसंचालक डॉ. डी.एल.जाधव, एसआयएएमचे अध्यक्ष समीर मुळे, उद्योजक रामचंद्र भोगले, विजय बोराडे,कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. टी. जाधव, डॉ. एस. बी. पवार, समन्वयक ॲड. वसंत देशमुख आदी उपस्थित होते.
कुलगुरू डॉ.इंद्रमणी म्हणाले, शेती क्षेत्रात नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने होणारे बदल शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी कृषि प्रदर्शन महत्वाचे ठरणार आहे. शेती क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व घटकांचा सहभाग घेत शेतीचा विकास साधायचा आहे. कृषि विद्यापीठाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नवे तंत्रज्ञान तसेच बाजारपेठेबाबत अद्ययावत माहिती देण्यासाठी विद्यापीठ सातत्याने प्रयत्न करणार आहे.
शेतकरी बांधवांच्या सर्वांगिण विकासासाठी सर्व मिळून प्रयत्न करुया असे सांगून कुलगुरू डॉ. इंद्रमणी म्हणाले, शेतीला चांगले भविष्य आहे. कृषि विद्यापीठाच्या माध्यमातून सद्यस्थितीत परभणी जिल्ह्यात 600 युवकांना आधुनिक शेती तसेच ड्रोन तंत्रज्ञानाबाबत प्रशिक्षण देण्यात येत आहे. मराठवाड्यातील इतरही जिल्ह्यांत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.
विधानसभेचे माजी अध्यक्ष आमदार हरिभाऊ बागडे म्हणाले, शेतीत नविन तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. कमी क्षेत्रात अधिक उत्पन्न घेण्यासाठी शेतकरी प्रयत्नशील आहे. कृषि प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नवतंत्राची माहिती मिळणार आहे.
आमदार सतीश चव्हाण म्हणाले, नविन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासठी हे कृषि प्रदर्शन महत्वाचे ठरणार आहे. यावेळी उद्योजक रामचंद्र भोगले, डॉ. देवसरकर यांनीही विचार व्यक्त केले. यावेळी शास्त्रज्ञ, कृषि तज्ज्ञ व शेतकरी उपस्थित होते.

# विनापरवाना मद्यप्राशन; सात जणांना दंड

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील एका हॉटेलमध्ये विनापरवाना दारू विक्री करून ग्राहकांना मद्य पिण्यास परवानगी दिल्याप्रकरणी हॉटेलचालकास तर परवाना नसताना मद्य प्राशन केल्याप्रकरणी ६ जणांना ठाणे उत्पादन न्यायालयाने दंड ठोठावला आहे.
खुलताबाद पोलिस हद्दीतील बाजार सावंगी येथे राज्य शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी १० नोव्हेंबर रोजी हॉटेल सपना येथे छापा टाकला. असता त्या ठिकाणी ६ जण विनापरवाना मद्य प्राशन करताना आढळले. तसेच हॉटेलचालक गणपत बाबूराव नलावडे यांनी हॉटेलमध्ये विनापरवाना मद्य ठेवले व ग्राहकांना मद्य पिण्यास परवानगी दिली. त्यामुळे ६ ग्राहक व हॉटेलचालक नलावडे अशा ७ जणांवर कारवाई करून गुन्हा दाखल केला. याबाबत १५ नोव्हेंबर रोजी खुलताबाद




न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. त्यानंतर न्यायालयाने हॉटेलचालक गणपत नलावडे याला २५ हजार रुपयांचा तर ६ ग्राहकांना प्रत्येकी ५०० रुपयांचा दंड ठोठावला. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक एन. एस. डहाके, दुय्यम निरीक्षक मधुकर उईके, प्रवीण पुरी, अशोक सपकाळ, अमित नवगिरे, सुरेश शिंदे, अमोल अन्नदाते यांच्या पथकाने केली. प्रथमवर्ग न्यायालय खुलताबाद येथे सरकारी पक्षाच्या वतीने सरकारी अभियोक्ता एस. ए. बनसोडे यांनी कामकाज पाहिले. अशी कारवाई सुरूच राहणार असल्याचे राज्य उत्पादक शुल्क विभागाने सांगितले आहे.

# जि. प. प्रा. शाळा सावळदबारा येथे क्रांतीकारक बिरसा मुंडा जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे दि १५ नोव्हेंबर २०२२ रोजी जि.प.प्रा. शाळा येथील शाळेत क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन केंद्र प्रमुख एम.डी. सोनवणे व भागवत गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले तर उपस्थित मुलांना क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या विषयी सखोल माहिती व भगवान बिरसा मुंडा यांनी केलेल्या इंग्रज सरकार विरोधातील उठाव संदर्भात थोडक्यात माहिती ही सतीश डोणेसर यांनी मुलांना अवगत करून दिली. शाळेतील मुलांना भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनचरित्रावर आधारित उलगु एक क्रांती हा चित्रपट देखील दाखवण्यात आला.
याप्रसंगी प्रा.जीवन कोलते पाटील, शाळेय समितीचे अध्यक्ष सुपडा तडवी,उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान, फकीराभाऊ तडवी, शिक्षकवृंद, केंद्र प्रमुख एम.डी.सोनवणे, भागवत गायकवाड, सतीश ढोणे,गवई सर,हिरास मँडम, अंगणवाडी सेविका, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# बाळासाहेब ठाकरे यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** हिंदूहृदयसम्राट शिवसेना प्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे साहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त जयभवानी नगर येथे बाळासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विधानसभा संघटक तथा मा.स्थायी समिती सभापती संभाजीनगर महानगरपालिका रेणुकादास (राजु) भाऊ वैद्य, उपशहरप्रमुख, दिग्विजय शेर खाने (उपशहर प्रमुख), रवी गायकवाड, मंगेश वाधवानी (विभाग प्रमुख), भिकनराव शेंदुरकर, गणेश कुन्हे, विजय अडलक (उपविभागप्रमुख), प्रशांत देशमुख, संदिप शिंदे (शाखाप्रमुख), पद्मा तुपे (उपशहर संघटक), सुकन्या भोसले, (शाखा संघटक), प्रकाश धुर्वे, आकाश पौळ (युवा सेना पदाधिकारी), गोविंद नेवार (गटप्रमुख), ज्ञानेश्वर सुलताने (उपशाखाप्रमुख), सचिन सुलताने, भागवत भारती (माजी शाखाप्रमुख), भरतभाऊ लकडे (माजी नगरसेवक), विष्णुनाना पुंगळे, नंदकुमार राऊत, शिवाजी चौथे, हनुमान कौचट, उध्दवराव थोराईत, मंचक निर्वळ, प्रभुदत्त खजीनदार, युवासेना उपजिल्हाप्रमुख प्रकाश धुर्वे, बापू कवळे तसेच मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.



# सोलापूर येथे पुढील महिन्यात गुरव समाजाचे महाअधिवेशन

## दहा हजार गुरव समाज बांधव उपस्थित राहणार

आधुनिक केसरी न्यूज

**उस्मानाबाद :** सोलापूर येथे ११ डिसेंबर रोजी गुरव समाजाचे महाअधिवेशन होणार असून, या महाअधिवेशनास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पालकमंत्री प्रा. तानाजी सावंत यांच्यासह सहा मंत्री उपस्थित राहणार आहेत. या महाअधिवेशनास उस्मानाबाद जिल्ह्यातील दहा हजार गुरव समाज बांधव उपस्थित राहणार असल्याची माहिती अणदूर श्री खंडोबा देवस्थान समितीचे सचिव सुनील ढेपे यांनी दिली. महाराष्ट्रात गुरव समाजाची संख्या जवळपास पाच लाखापेक्षा जास्त असून, अल्पसंख्याक समाज म्हणून गुरव समाजाची ओळख आहे. राज्यातील विविध मंदिराचे पुजारी गुरव समाजाचे आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यात अणदूर - नळदुर्गचा श्री खंडोबा, येरमाळ्याची येडेश्वरी देवी तसेच जिल्ह्यातील अनेक मंदिराचे पुजारी हे गुरव समाजाचे आहेत, पण मागील काही काळात गुरव समाजावर अत्याचार वाढले करून, मंदिराचे पुजारीपद काढून घेण्याचे प्रयत्न सुरु आहेत. तसेच गुरव समाजाच्या ताब्यात असलेल्या देवस्थान इनामी जमिनी अनेकांनी लाटल्या आहेत. गुरव समाजावरील अत्याचार बंद व्हावा, अशी प्रमुख मागणी आहे. तसेच देवस्थान इनामी जमिनी वर्ग - ३ खालसा करून गुरव समाजाच्या नावे कराव्यात (जेणेकरून पीक कर्ज, विमा तसेच शासनाचे विविध लाभ मिळतील) ज्या देवस्थान समिती शासनाच्या ताब्यात आहेत. त्या समितीमध्ये पुजारी - गुरव समाजाला प्रतिनिधित्व देण्यात यावे, पुजाऱ्यांना मंदिरात पोलीस संरक्षण देण्यात यावे आदी मागण्या करण्यात येणार आहेत.

गुरव समाज महासंघाचे अध्यक्ष आणि बुलढाण्याचे माजी आमदार विजयराज शिंदे यांच्या नेतुत्वाखाली सोलापूर येथे पुढील महिन्यात (११ डिसेंबर) होणाऱ्या या महाअधिवेशनाचे निमंत्रण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांना बुधवारी देण्यात आले. यावेळी गुरव समाज महासंघाचे सचिव मल्लिकार्जुन गुरव (सोलापूर) उपाध्यक्ष यशवंत ढेपे (बाळे) आदी उपस्थित होते.

# न्यायमंदिर आवारात पती-पत्नीमध्ये गुद्दागुद्दी

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** कौटुंबिक वादातून दाखल खावटीच्या खटल्यावेळी न्यायमंदिर आवारात पती-पत्नीमध्ये पुन्हा वाद झाल्याने दोन्ही कुटुंबांमध्ये हाणामारी झाली. त्यात पती जखमी झाला. शहरातील शनिपेठ परिसरातील शिरीनबी यांचा विवाह फातेमानगर परिसरातील सय्यद अफसर सय्यद अख्तर यांच्याशी झाला आहे. कौटुंबिक वादातून गेल्या सहा वर्षांपासून दोघेही विभक्त राहत आहेत. शिरीनबी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती अफसरसह त्याच्या कुटुंबियांवर कौटुंबिक हिंसाचाराचा गुन्हा दाखल झाला आहे. खावटीची मागणी केली असता, ती मान्य झाली आहे. शिरीनबीच्या म्हणण्यानुसार, अफसर हा बुधवारी न्यायालयात हजर झाला. त्याने न्यायालयाच्या बाहेरच पत्नीसह तिच्या कुटुंबियांना शिवीगाळ करीत बेदम मारहाण केली. अफसर याने सांगितल्यानुसार, न्यायालयात हजर झाल्यानंतर पत्नी शिरीनबीसह तिच्या कुटुंबियांनी बाहेरून पंधरा ते वीस गुंड बोलावून घेत लाठ्याकाठ्यांनी बेदम मारहाण केली. ठार मारण्याचा प्रयत्न केला. पत्नीस नांदवण्यास तयार असनूही असा प्रकार घडल्याचे त्याने सांगितले.

# शासकीय गायरान जमिनीवर अतिक्रमण केलेल्या नागरिकांना शासनाने अभय द्यावे

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील गायरान जमीन अतिक्रमणधारकांचे अतिक्रमण शासन निर्णय काढून टाका णार आहे परिणामी अनेक अतिक्रमणधारक नागरिक या आदेशानुसार बेघर होणार आहेत त्यासाठी न्यायालयाच्या आदेशाचा पूर्ण विचार करण्यासाठी शासनाने याचिका दाखल करून सर्वसामान्य नागरिकांना अभय द्यावे या मागणीचे निवेदन फुलंब्री तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने फुलंब्रीच्या तहसीलदार डॉक्टर शितल राजपूत यांना देण्यात आले तालुक्यात गायरान जमिनीवर अनेकांनी अतिक्रमण केले आहे ते करण्यात यावे अशा प्रकारचा आदेश उच्च न्यायालय दिलेले आहे या निर्णयाने अतिक्रमणधारक असलेले भूमिहीन गोरगरीब कष्टाळू झोपडपट्टी मध्ये राहणारे नागरिक बेघर होणार आहे या लोकांना राहण्याकरता व उपजीविका भागवण्याकरिता दुसरे साधन नाही यामुळे गरिबांचा विचार करून त्यांना दिलासा मिळवून द्यावा शासनाच्या वतीने पूर्ण विचारण्याची केली जावी या मागणीचे निवेदन भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष सुहास शिरसाट यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले यावेळी ज्येष्ठ नेते सांडू जाधव , भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष वाल्मीक जाधव नगरसेवक शेखर पालकर बाबासाहेब शिंगारे चंद्रकांत राऊत मयूर कोळते आदींची उपस्थित होती.



# मोलखेडा हिवरी येथे लोक सहभागातून बंधाऱ्याची निर्मिती



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा, हिवरी येथे दि.१७/११/२२ रोजी सोयगाव कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी एस.जी.वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसहभागातून वनराई बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली. या वनराई बंधारा निर्मितीसाठी कृषी पर्यवेक्षक अतुल पाटील, कृषी सहाय्यक अर्जुन सुरडकर,स्वानंद पाटील यांनी स्वतः परिश्रम केले.या वनराई बंधाऱ्याच्या पासून शेतकऱ्यांना व जनावरांना याचा लाभ होईल अशे कृषी सहाय्यक मानसिंग भोळे यांनी यावेळी सांगितले. तसेच याप्रसंगी प्रगतशील शेतकरी रामभाऊ वारंगणे, डिंगाबर पाटील, अमोल शेळके, अतुल इंगळे, गणेश शिनगारे,अभिमान पाटील, संग्रामसिंग पाटील, विजय वारंगणे, भूषण पवार, मख सर यांनी वनराई बंधारे निर्मितीसाठी सहकार्य केले.

# उसदरासाठी ट्रॅक्टर पेटवल्याने आंदोलन चिघळण्याची चिन्हे

आधुनिक केसरी न्यूज

**कराड :** स्वाभिमानी शेतकरी संघटनेने ऊसदराच्या प्रमुख मागणीसाठी राज्यभरासाठी पुकारलेल्या दोन दिवसीय उसतोड बंद आंदोलनाची सुरुवात होत असतानाच बुधवारी रात्री उशिरा ऊस वाहतूक करणारा ट्रॅक्टर कराडजवळ पेटवून देण्यात आल्याने हे आंदोलन चिघळण्याची चिन्हे आहेत.

उसाला एफआरपी अधिक किमान साडेतीनशे रुपये उसदर जाहीर करावा. संपूर्ण एफआरपी पहिली उचल म्हणून तर उर्वरित साडेतीनशे रूपये त्यानंतर देण्यात यावे या आपल्या मागणीकडे राज्यकर्ते व साखर कारखानदारांचे लक्ष वेधण्यासाठी “स्वाभिमानी’चे नेते, माजी खासदार राजू शेट्टी यांनी आज गुरुवारी (दि. १७) व उद्या शुक्रवारी (दि. १८) या दोन दिवसात राज्यभर उसतोड बंद ठेवण्याचे आवाहन शेतकऱ्यांना केले होते. तर, कोणत्याही परिस्थितीत ऊस वाहतूक होऊ नये असा इशारा शेट्टींनी साखर कारखानदारांना व ऊस वाहतुकदारांना दिला होता. या आंदोलनाला बुधवारी मध्यरात्रीपासून प्रारंभ झाला. तर, रात्री उशिराच्या सुमारास कराड तालुक्यातील इंदोली येथे ऊस वाहतूक करणारा ट्रॅक्टर अज्ञात ७ – ८नी लोकांनी पेटवून दिल्याने एकच खळबळ उडाली.

# औराळी येथे साकारतेय विठ्ठल- रुक्माई व शंकराचे भव्य मंदिर

## १५० वर्षापूर्वी जुने लाकडी असलेल्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा ग्रामस्थांचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील औराळी गावाचे धार्मिक क्षेत्रात, वारकरी संप्रदायात, कलाक्षेत्रात व राजकीयक्षेत्रात मोठे नावलौकीक आहेत. श्रीक्षेत्र आळंदी देवाची येथील २०० वर्षाची वारकरी परंपरा असलेल्या श्रीसंत जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना संस्कृत विषयाचे विनामुल्य अध्यापन करण्यात आपले संपूर्ण जीवन समर्पित करणाऱ्या व हजारो नामवंत गुणवंत किर्तनकार घडविणाऱ्या वैकुंठवासी गुरुवर्य रामचंद्र बाबा निकम यांची जन्मभूमी असलेल्या औराळी या १२५ उंबरा असलेल्या छोट्या गावात असंख्य भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या अंजनी पवनसुत मारोतीरायाचे, पंढरीच्या विठ्ठल- रुक्माई व कैलासपती शंकर महादेवाचे ४५ लाखांचे भव्य दिव्य असे मंदिर लोकवर्गणीतून पुर्णात्वाकडे जाते आहे. १५० वर्षापूर्वी जुने लाकडी असलेल्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी एक वर्षांपूर्वी घेतला होता. आजरोजी जवळपास ७५ टक्के मंदिराचे काम पूर्ण झाले आहे. असून फरशी, कलर यासह अन्य काम बाकी असुन काही दिवसातच ते देखील मंदिराचे काम पूर्ण होईल आणि भक्तीमय वातावरणात मारुतीरायाच्या, शंकर महादेवाच्या आणि पंढरीच्या विठ्ठल रुक्माई मूर्तींचा प्राणप्रतिष्ठा सोहळा अगदी मोठ्या थाटामाटात संपन्न होणार असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

**दाक्षिणात्य पध्दतीचे बांधकाम –** मंदिरासाठीची ३ हजार स्कवेअर फुट जागा असुन, २ हजार ७० स्क्वेअर फुट मंदिराचे बांधकाम आहे. मंदिराचे गांभारे १२×१२ एक १०×१० दोन आहेत. ८५० स्क्वेअर फुटाचा भव्य असा सभामंडप बांधण्यात आला आहे. ह्या संपूर्ण मंदिराच्या बांधकामात अतिशय बारीक नक्षीकाम करण्यात येत असुन हे दाक्षिणात्य पध्दतीने मंदिर आहे किं, असा क्षंणभर भास मंदिर बघितल्यावर येतो.



मारोतीराया, विठ्ठल-रुख्माई, शंकर महादेवाच्या मंदिराचा ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून आता येत्या काही दिवसात नक्कीच काया पालट व जीर्णोद्धार होणार आहेत .काम आता पुर्णात्वाकडे जाते अगदी थोड्याच दिवसात गावातील नागरिकांचे भव्य दिव्य आणि सुंदर मंदिराचे स्वप्न साकार होणार आहे . **–विठ्ठल महाराज शिंदे ( औराळी)**

ज्ञानदेवे रचीला पाया ऊभारीले देवालया " या न्यायाने आपल्याही गावात छानसं मंदीर असाव .आणी म्हणुन ग्रामस्थांनी नविन मंदीर संकल्पना मांडली . आजरोजी पुर्णत्वाच्याकडे अंतीम आहे . न्यायाने परमात्म्याच्या सुरेख मुर्ती समोर रोज सकाळ संध्याकाळ नतमस्तक होण्यास मन लालाईत व्हावं असं सुरेख मंदीर माझ्या गावी साकार होत असल्याने मनस्वी आनंद होतो आहे . **संतोष महाराज निकम ( औराळी)**

# बाबासाहेबांच्या स्मृतीनिमित्त अक्षयसेवा संशोधन प्रतिष्ठानतर्फे व्याख्यानमाला



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान आणि कौशिक आश्रम च्या वतीने मित्रमंडळ सभागृह येथे पद्मविभुषण, महाराष्ट्रभुषण, शिवशाहीर कै. बाबासाहेब पुरंदरे यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त तीन दिवस व्याख्यानमाला घेण्यात आली. त्यात बाबासाहेबांचा संघध्यास या विषयावर बाबासाहेबांच्या संघजीवनातील १५ प्रसंग अभिनव सादरीकरणातुन सर्वांसमोर उलगडण्यात आले. बालपण, संघसंस्कार, पू. डॉ. हेडगेवार यांचा परिसस्पर्श, सत्याग्रह, दादरानगर नगर हवेली संग्राम, तळजाई शिबिर, रामजन्मभुमी आंदोलन, शिवसृष्टी असे प्रसंग सादरीकरणातुन बाबासाहेबांचे योगदान अतिशय अभिनव पध्दतीने दाखवले गेले. हा प्रवास संघगीतातून प्रभावीपणे सर्वांना मंत्रमुग्ध केले. संस्कार भारतीच्या संगीत विद्या समुहाने ही गीते सादर केली. शिवऋषींची शिवसाधना- जाणता राजाचा रंजक प्रवास जाणता राजा या महानाट्याचे पहिले दिग्दर्शक दिवाकर पांडे आणि संजय पुरंदरे यांनी दृकश्राव्य माध्यातून सर्वांसमोर उलगडला. जाणता राजा महानाट्यामागील बाबासाहेबांचे चिंतन आणि त्यांची भूमिका एक एक प्रसंगानुसार मांडत जाणता राजा महानाट्यच सर्वांसमोर उभे केले. इतिहास ते भविष्य व्दारा वर्तमान- भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांनी इतिहास ते भविष्य व्दारा वर्तमान या विषयाव्दारे बाबासाहेबांच्या ऐतिहासीक कारकिर्दीला प्रभावीपणे उजाळा दिला. दिलेली वेळ व शब्द पाळण्याबद्दल बाबासाहेब सर्वश्रृत होते. एका कार्यक्रमाला थोडे उशिरा पोहचले म्हणुन स्वतःला दंड करुन घेतला असे विविध संदर्भ देत विनयजींनी बाबासाहेंबाच्या स्मृतींचा जागर केला.

मित्रमंडळ सोसायटी अध्यक्ष अजय मराठे दादारानगर हवेलीचे स्वातंत्र्यसेनानी वसंत प्रसादे, इतिहासकार सु.ह.जोशी ,रा.स्व. संघाचे प्रांत कार्यवाह डॉ.प्रविण दबडघाव आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते. प्रेक्षकांचा या व्याख्यानमालेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



# औराळा येथे बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील औराळा येथील शिवसेना शाखेच्या वतीने गुरुवारी दिनांक १७ नोव्हेंबर रोजी हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिन साजरा करण्यात आला, याप्रसंगी माजी जिल्हाध्यक्ष डॉ अण्णासाहेब शिंदे व माजी पंचायत समिती सदस्य गोरख बोराडे यांच्या उपस्थितीत शिवसेना नेते स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून स्मृतिदिन साजरा केला व अभिवादन करण्यात आले. यावेळी शाखाप्रमुख सतीश जिवरख, मुन्ना खंडेलवाल, दादा वाघचौरे, योगेश पवार, उपसरपंच आकाश पगारे, योगेश जिवरख, दीपक जिवरख, प्रभाकर बागुल, भारत मिसाळ, सुभाष रिंढे, गणेश अंगुने ,पोलीस पाटील सतीश पगारे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# आ. पडळकर, खोत यांची सरकारवर टीका

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** तत्कालीन उद्धव ठाकरे सरकारच्या काळात एसटी कर्मचारी आंदोलनात सहभाग घेणाऱ्या आ. गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत यांनी शिंदे सरकारला घरचा अहेर दिला आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे हे सरकार दुर्लक्ष करत असल्याचे सांगत आ. पडळकर आणि सदाभाऊ खोत यांच्या सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाने मुख्यमंत्र्यांना हिवाळी अधिवेशनात आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनानंतर सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघ, महाराष्ट्र राज्य स्थापन झाला. या संघाचे अध्यक्ष गोपीचंद पडळकर तर मुख्य कार्याध्यक्ष सदाभाऊ खोत आहेत. संघाकडून मुख्यमंत्री शिंदे यांना पत्र देत एसटी कर्मचारी विलीनीकरण आंदोलना दरम्यान मान्य केलेल्या १६ मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिल्यावरही अद्याप काही झाले नाही. नागपुरातील हिवाळी अधिवेशनात आमरण उपोषणाचा इशारा दिला गेला. पत्रात मुख्यमंत्र्यांना एसटी आंदोलनादरम्यानच्या घटना आणि त्यांनी दिलेल्या आश्वासनाची आठवण करून दिली गेली.


# जनतेला विचारून मी १५ दिवसांत निर्णय घेणार : चिकटगावकर



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील व विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या उपस्थित काल मुंबईच्या राष्ट्रवादी प्रदेश कार्यालयात झालेल्या काँग्रेस नेत्यांच्या पक्षप्रवेशानंतर औरंगाबादच्या ष्ट्रवादीत मोठी फूट पडली आहे. कारण वैजापूरचे माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगावकर यांनी आमदार सतिश चव्हाण यांच्यावर गंभीर आरोप केले आहे. प्रत्येक विधानसभा निवडणुकीच्या आधी आपल्याच पक्षाच्या नेत्यांच्या विरोधात सतीश चव्हाण एक गट तयार करून त्यांना पाडण्याचा प्रयत्न करत असतात. तर औरंगाबाद जिल्ह्यात राष्ट्रवादीचा आमदार कसा निवडून येणार नाही यासाठी देखील सतीश चव्हाण प्रयत्न करत असल्याचा आरोप देखील भाऊसाहेब पाटील चिकटगावकर यांनी केला आहे. वैजापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी हे आरोप केले आहेत. यावेळी बोलताना चिकटगावकर म्हणाले की, ज्या ठिकाणी राष्ट्रवादीचे आमदार आहेत त्याठिकाणी निवडणुकीच्या पूर्वी पक्षात वेगळा गट तयार करण्याचे काम आमदार चव्हाण करतात. त्यानंतर निवडणूक लागताच त्या गटाला विरोधी पक्षात पाठवून आपल्याच राष्ट्रवादीच्या उमेदवाराला पाडण्याचे काम चव्हाण यांच्याकडून सुरू आहे. वैजापूर येथील काँग्रेसच्या ठोंबरे गटाच्या राष्ट्रवादीच्या प्रवेशाला मी विरोध करून देखील त्यांना अजित पवारांच्या उपस्थितीत काल प्रवेश देण्यात आल्याचं म्हणत चिकटगावकर यांनी नाराजी व्यक्त केली.

तालुक्यातील कार्यकर्त्यांची गावागावात जाऊन मी भेट घेणार आहे. त्यांच्याशी चर्चा केल्यानंतरच कोणत्या पक्षात जायचं किंवा राष्ट्रवादी थांबायचं याबाबत मी निर्णय घेणार असल्याचे सुद्धा चिकटगावकर यांनी स्पष्ट केलं. विशेष म्हणजे शिंदे गट सोडून सर्वच पक्षाचे माझ्यासाठी पर्याय खुले असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट बोलून दाखवलं. त्यामुळे आगामी काळात चिकटगावकरांनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी दिल्यास नवल वाटू नये.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in